नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १३४ * * अकोला * सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्ली ब्लास्टनंतर दोन ब्रिटिश डॉक्टरांना अटक

■ वृत्तसंस्था, बहराइच, दि. १६ :
१० नोव्हेंबरच्या सायंकाळी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोटानंतर पोलिस आणि तपास यंत्रणा सतत अलर्टवर आहेत. यूपीच्या अनेक शहरांमध्ये देखील तपास सुरू आहे आणि ताबडतोब छापे मारले जात आहेत. दिल्ली ब्लास्टमध्ये अनेक डॉक्टरांचा संबंध समोर आला आहे. फरीदाबाद येथील रहिवासी डॉ. शाहीन, लखनऊ येथील तिचा लहान भाऊ डॉ. परवेज आणि अनेक अन्य डॉक्टर यांना अटक करण्यात आली आहे.बहराइचमध्ये भारत-नेपाळ सीमा ओलांडण्याचा प्रयत्न असलेले दोन ब्रिटिश नागरिक पकडले गेले आहेत. त्यापैकी एक ३५ वर्षीय पाकिस्तानी मूळाचा युवक आहे तर दुसरी ६१ वर्षीय महिला भारतीय असलेली ब्रिटिश नागरिक आहे.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## बालिकेवरील क्रूरता

परवाच बालदिन झाला. त्याच्या पूर्व संध्येच्या एक दोन दिवस अगोदर अवघ्या बारा वर्षाच्या एका मुलीला दहा मिनिटे शाळेत येण्यास उशीर झाल्यामुळे अत्यंत प्राणघातक शिक्षा देण्यात आली. उशिरा आल्याची शिक्षा म्हणून त्या बालिकेला शंभर उठाबशा काढायला लावल्या. विशेष म्हणजे ती चिमुरडी आजारी असताना तिला शिक्षा दिल्याने तिचा सरतेशेवटी तडफडत तडफडत जीव गेला. आपल्या महाराष्ट्रातील वसई सारख्या शहरातील ही घटना आहे. ज्याच्याकडे हृदय आहे अशा प्रत्येक व्यक्तीला याबद्दल केवळ हळहळच वाटणार नाही तर मनात प्रचंड चीड निर्माण होईल. एवढ्या लहान वयाच्या बालिकेला लहानशा चुकीबद्दल अशी क्रूर शिक्षा देणाऱ्या शिक्षकांच्या मनात ही सैतानी बुद्धी कुठून आली आणि शिक्षा म्हणून वापरावीशी वाटली याचे संशोधन झालेच पाहिजे. वसई पूर्व येथील सातिवली कुवरा पाडा परिसरात हनुमंत विद्यामंदिर या शाळेमधील ही घटना आहे. या शाळेला पालकांनी कुलूप ठोकले. गटशिक्षण अधिकाऱ्यांनीही कारवाई केली आहे, पुढे चौकशी आणि दोषींना शिक्षा होईलही. पण बिचाऱ्या त्या मुलीच्या जीवाची भरपाई कशी होणार याचे उत्तर कोणीतरी देऊ शकेल का. अजून तरी मानवाच्या हाती एखाद्याच्या क्रूर वागण्यामुळे गेलेला जीव परत आणण्याचे कसब नाही. गेल्या काही वर्षात लहान बालकांवर आणि विशेषतः बालिकांवर असे अनेक प्रसंग आलेले आहेत. संबंधित शिक्षक आणि शाळा चालवणाऱ्या संस्था यांनी आता कितीही सारवासारव केली तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. कारण सर्प निघून गेल्यावर भुईवर कितीही काट्या मारल्या तरी सर्प मरत नसतो, आपल्या शाळेत शिकणाऱ्या एखाद्या अबोध बालिकेवर कोणतेही शिक्षक अशी क्रूरता कशी करू शकतात हाच आमच्या पुढील यक्षप्रश्न आहे. या घटनेच्या अनुषंगाने एका बाबीचा विचार करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. ते म्हणजे लहान बालकांच्या वयाप्रमाणे विचार केला तर आधीच त्यांचे बालपण अभ्यासाच्या बोज्याखाली दबलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचे दप्तर कल्पनाही करता येणार नाही इतके जड असते. त्यातच महागडी वह्या पुस्तके, शाळेची जीवघेणी फी याशिवाय लहान मोठ्या प्रसंगासाठी आणि कार्यक्रमासाठी मागण्यात येणारी रक्कम या सर्व ओज्याखाली पालक सर्वाधिक पिचलेला असतो. हे सर्व कमी झाले असेल म्हणून की काय त्या बिचाऱ्या बालिकेवर हा जीवघेणा प्रसंग आणणाऱ्या शिक्षकाला शिक्षक कसे म्हणता येईल हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे या शिक्षेमध्ये एका शिक्षकेचाही सहभाग आहे ही अजूनही गंभीर बाब आहे. त्या बालिकेला शिक्षा करणारे शिक्षक आणि शिक्षिकेजवळ मातृहृदय आहे की नाही याचाही शोध घेतला गेला पाहिजे. जे शिक्षक किंवा ज्या शिक्षिका आहेत त्यांनी मातेच्या ममतेने बालकांना शिकवले पाहिजे. या वयातील बालिकांना प्रेम दिले पाहिजे. त्यांच्या चुकांवर पांघरून घालून त्या सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या उलट अशा शिक्षकांचे मानसिक संतुलन अशा प्रकारे बिघडलेले असेल तर शिक्षणाचा अर्थ तरी काय. आम्हाला या घटनेची केवळ जुजबी माहिती मिळालेली आहे. ते वाचून आमच्या मनात दुःखाचा कोलाहल झालेला आहे त्यामुळेच या घटनेचा निषेध करण्यासाठी या स्तंभाच्या माध्यमातून जीव गमावलेल्या बालिकेवर केलेल्या क्रूरतेचा आम्ही निषेध करीत आहोत. त्या निष्पाप अल्पवयीन बालिकेच्या आत्म्याला शांती मिळो आणि अन्याय करणाऱ्यांवर आसूड ओढले जावोत, एवढेच आमचे म्हणणे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### बिहारमध्ये एनडीएने जागावाटपाचा फॉर्म्युला केला निश्चित

# नितीश यांचा आज राजीनामा



■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. १६ :
बिहारमध्ये नवीन सरकार स्थापनेसाठी एनडीएने आपली रणनीती जवळजवळ अंतिम केली आहे. रविवारी झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत भाजपा आणि जेडीयूमध्ये मंत्रिपदांच्या वाटपावर एकमत झाले. नितीश कुमार मुख्यमंत्री राहतील, तर भाजपाचे मंत्रिमंडळात जास्त प्रतिनिधित्व असेल. त्यांच्या कामगिरीच्या आधारे मित्रपक्षांचा समावेश करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अलिकडेच जाहीर झालेल्या निवडणूक निकाल आणि जागा गुणोत्तराच्या आधारे हा संपूर्ण फॉम्युर्ला ठरवण्यात आला.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीत स्पष्ट झाले की भाजपाला नवीन सरकारमध्ये १५-१६ मंत्रिपदे मिळू शकतात. निवडणुकीत पक्षाने चांगली कामगिरी केली आणि ८९ जागांसह सर्वात मोठा घटक पक्ष म्हणून उदयास आला. अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, कारण भाजपाचा वाढता जनसमर्थन सरकारमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व असले पाहिजे. नवीन सरकारमध्ये जेडीयूला सुमारे १४ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पक्षाने ८५ जागा जिंकत महायुतीच्या बळकटीकरणात केंद्रस्थानी भूमिका बजावली. जरी भाजपापेक्षा जागा कमी मिळाल्या असल्या तरी मुख्यमंत्रीपद जेडीयूचे प्रमुख नितीश कुमार यांच्याकडेच राहणार आहे. गठबंधनाची स्थिरता आणि मागील कार्यकाळात निर्माण झालेल्या सामंजस्यपूर्ण कार्यपद्धतीचा विचार करून हा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एलजेपी (रामविलास) ला १९ जागा मिळाल्याने तीन मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. जितन राम मांझी यांच्या एचएएम (एस) ला एक पद मिळू शकते आणि उपेंद्र कुशवाह यांच्या आरएलएम लाही एक पद मिळू शकते. बैठकीत प्रत्येक सहा आमदारांमागे एक मंत्रिपदाचा फॉम्युर्ला स्वीकारण्यासही सहमती झाली, ज्यामध्ये संतुलित सामायिक प्रतिनिधित्व राखले जाईल. सूत्रांच्या मते, नवीन सरकारचा शपथविधी १९ किंवा २० नोव्हेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळ स्थापनेचे चित्र स्पष्ट होत असताना, राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. एनडीए देखील या समारंभाकडे शक्तीप्रदर्शन म्हणून पाहत आहे, कारण युतीने एकूण २०२ जागा जिंकून चांगली कामगिरी केली.

या निवडणुकांमध्ये, विरोधी पक्ष फक्त ३५ जागांवर राहिला, तर भाजपा जवळपास ९५ टक्के आघाडीवर होता. पराभवानंतर, काँग्रेसने मतदार यादीच्या "घाईघाईने" केलेल्या सुधारणांना जबाबदार धरत निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान, भाजपाचा दावा आहे की जनतेने जाती आणि धर्माच्या राजकारणाला नकार दिला आहे आणि एनडीएला निर्णायक जनादेश दिला आहे आणि या निकालाचा पुढील वर्षी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील निवडणुकांवरही परिणाम होईल.

## दिल्ली बॉम्बस्फोटातील कारच्या मालकाला अटक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
१० नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ला बॉम्बस्फोटात सहभागी असलेली लखनऊची रहिवासी डॉ. शाहीन सईद ही पाकिस्तान समर्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी १० वर्षांपासून संबंधित होती. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, शाहीन २०१५ मध्ये जैशमध्ये सामील झाली.

अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, शाहीनने एक वर्ष काम केले आणि जैश-ए-मोहम्मद (जेईएम) ला संवेदनशील माहिती पुरवली. ती २०१६ मध्ये जैशची सक्रिय सदस्य बनली. गेल्या १० वर्षांत दहशतवाद्याच्या ठावठिकाणाबद्दल आणि तिच्या नेटवर्कमध्ये सामील झालेल्या सर्वांबद्दल सुरक्षा संस्था चिंतेत आहेत.

भास्करच्या तपासात असे दिसून आले की व्हाईट कॉलर दहशतवादी मॉड्यूल वर्षानुवर्षे कट रचत होता. २०२१ मध्ये, जेव्हा एका नातेवाईकाने डॉ. शाहीनला तिचा पती, मुले आणि नोकरी सोडण्याबद्दल विचारले तेव्हा त्या महिला दहशतवादीने उत्तर दिले, "कुटुंब आणि नोकरीचा काय अर्थ आहे? मी स्वतःसाठी पुरेसे जगले आहे." शाहीन म्हणायची, "आता माज्या समुदायाचे ऋण फेडण्याची वेळ आली आहे. मी जे काही करेन, तुम्हाला सर्वांना त्याचा अभिमान वाटेल."

तपास यंत्रणांनी शाहीनचा सहकारी डॉ. मुझम्मिलच्या डायरीतून "ऑपरेशन हमदर्द" उघडकीस आणले आहे. त्यात मुस्लिम मुलींना हल्ल्यांसाठी तयार करण्याची योजना होती. शाहीन हे काम पार पाडणार होती. २५-३० लोकांचे हे नेटवर्क जम्मू-काश्मीर आणि फरीदाबादशी जोडलेले आहे. दिल्ली बॉम्बस्फोटांप्रकरणी दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) रविवारी लखनौ येथून दोन संशयितांना ताब्यात घेतले. आरोपी हे पारा परिसरातील कुंदन विहारमध्ये राहणारे एक भाऊ आणि बहीण आहेत. सूत्रांचे म्हणणे आहे की, त्यांचे बॉम्बस्फोटांशी संबंध आहेत. आरोपींची नावे अद्याप जाहीर झालेली नाहीत. कुटुंबातील सदस्य अद्याप पुढे आलेले नाहीत.

## आफ्रिकेकडून भारताचा पराभव

■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १६ :
कोलकाता कसोटीत भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३० धावांनी पराभव पत्करावा लागला. गेल्या १५ वर्षांत घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना गमावण्याची ही पहिलीच वेळ आहे. ग्रॅहम स्मिथच्या नेतृत्वाखाली २०१० मध्ये नागपूरमध्ये भारताचा शेवटचा पराभव झाला होता.

रविवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला ९ बाद ९३ धावाच करता आल्या. कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे आदल्या दिवशी निवृत्त झाला होता. वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक ३१ धावा केल्या. सायमन हार्मरने सामन्यात एकूण ८ बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने सामन्यातील एकमेव अर्धशतक झळकावले, दुसऱ्या डावात ५५ धावांवर नाबाद राहिला. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेचा संघ दुसऱ्या डावात १५३ धावांवर सर्वबाद झाला. शुक्रवारी नाणेफेक जिंकून संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या डावात १५९ धावा केल्या. भारताने पहिल्या डावात १८९ धावा केल्या होत्या. भारताला पहिला झटका शून्य धावांवर बसला. यशस्वी जैस्वाल एकही धाव न घेता बाद झाला. मार्को यान्सनेच्या चेंडूवर काइल व्हेरेनने त्याला झेलबाद केले.दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. संघाने १ रनवर दुसरी विकेट गमावली. मार्को यान्सनने केएल राहुलला बाद केले. १ धाव काढून राहुल पॅव्हेलियनमध्ये परतला.



हार्मर ठरला गेम चेंजर

## फॉर्च्युनरची ट्रॅक्टर-ट्रॉलीवर धडक

### ५ जणांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था, ग्वाल्हेर, दि. १६ :
ग्वाल्हेरमध्ये, एका वेगाने येणाऱ्या फॉर्च्युनर कारची वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीशी टक्कर झाली. धडक इतकी भीषण होती की फॉर्च्युनरमधील पाचही जणांचा जागीच मृत्यू झाला. कार ट्रॉलीखाली चिरडली गेली, त्यामुळे एकही प्रवासी जिवंत राहिला नाही.

रविवारी पहाटे ५:३० ते ६ च्या दरम्यान शहरापासून पूर्वेला असलेल्या ग्वाल्हेर-झाशी महामार्गावर हा अपघात झाला. सर्व मृत ग्वाल्हेरचे रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. ते उत्तर प्रदेशातील झाशीहून एका कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर फॉर्च्युनर कार क्रमांकाच्या MP०७ CG ९००६ ने ग्वाल्हेरला परतत होते. कार मालवा कॉलेजजवळ येताच, वाळूने भरलेली ट्रॅक्टर-ट्रॉली वळणावर आली. वेग जास्त असल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ती मागून ट्रॉलीला धडकली.

मृतदेह कार आणि ट्रॉलीमध्ये अडकले होते. पोलिस आणि स्थानिक रहिवाशांनी कटरच्या साहाय्याने कार कापून मृतदेह बाहेर काढले. अपघातातील मृत व्यक्तींची नावे आदित्य जादोन, राम पुरोहित, क्षितिज उर्फ प्रिन्स राजावत, कौशलेंद्र भदोरिया, अभिमन्यू सिंग आहे. स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. प्रिन्स हा एका प्रॉपर्टी डीलरचा एकुलता एक मुलगा होता ही फॉर्च्युनर गाडी ग्वाल्हेर येथील प्रॉपर्टी डीलर उमेश राजावत यांची आहे. शनिवारी रात्री ९ वाजता ते शनिचरा धामहून परतले होते. त्यांचा एकुलता एक मुलगा प्रिन्स राजावत गाडी घेऊन गेला होता. राष्ट्रीय महामार्ग रुग्णवाहिकेचे प्राथमिक वैद्यकीय अधिकारी पंकज यादव यांनी सांगितले की, सकाळी साडेसहा वाजता त्यांना सिरोल पोलिस ठाण्याकडून मालवा कॉलेजसमोर अपघात झाल्याची माहिती मिळाली. ते आणि डाबरा येथील त्यांची टीम सकाळी सात वाजता घटनास्थळी पोहोचली.

### हवेत गोळीबार करणाऱ्यांना जमीन दिसली

## फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. १६ :
विरोधक हे सातत्याने आरोप करतात, पण कोर्ट जेव्हा त्यांना पुरावे मागते, तेव्हा ते देत नाहीत. निवडणूक आयोग देखील त्यांना पुरावे मागतो, पण एक पुराव देखील विरोधक देऊ शकत नाहीत. हवेत गोळीबार करणाऱ्यांना जमीन दिसलेली आहे, मात्र अजुनही ते सुधरले नाहीत. महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही त्यांची अशाच प्रकारची माती होणार असल्याचे भाकित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



छत्रपती संभाजीनगर शहरात आज भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. हे कार्यालय मराठवाडा विभागासाठी असणार आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. आजचा दिवस आपल्या सगळ्यांसाठी महत्त्वाचा दिवस आहे. मी विशेष उल्लेख आणि अभिनंदन मंत्री अतुल सावे यांचे करू इच्छितो. त्यांनी छत्रपती संभाजीनगरमधील कार्यालय उभारताना अतिशय मोलाची भूमिका बजावली. जमीन शोधण्यापासून ते कार्यालयाची इमारत उभी राहण्यापर्यंत सातत्याने येणाऱ्या अडचणींचा सामना अतुल सावे यांनी केला, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आपले नेते प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांचे मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगरवर प्रचंड प्रेम होते. भाजपच्या वाटचालीत प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, वसंतराव भागवत या सगळ्या लोकांनी सातत्याने आपली कार्यालये झाली पाहिजेत, पक्षाला स्थैर्य आले पाहिजे, यासाठी त्या काळात खूप प्रयत्न केले. त्याकाळची आपली परिस्थिती आणि पद्धतीनुसार जसे मिळतील तसे कार्यालये त्या काळात उभे केले आणि पक्षाला चालवले. कुठे नाही उभे राहू शकले, तर किरायाच्या जागेवरून पक्ष चालवला. पण आपली कार्यालये चांगली असली पाहिजेत.

### श्रीनगर पोलिस स्टेशनमध्ये झालेला स्फोट तेजस्वी प्रकाशामुळे

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १६ :
श्रीनगरमधील नौगाम पोलिस स्टेशनमध्ये १४ नोव्हेंबर रोजी झालेल्या सॅम्पलिंग दरम्यान झालेल्या स्फोटाला फॉरेन्सिक टीमने अपघात असल्याचे म्हटले आहे आणि तो दहशतवादी हल्ला नसल्याचे स्पष्ट केले आहे. फॉरेन्सिक टीमच्या प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, एफएसएल आणि एनएसजी टीम हरियाणाच्या फरिदाबाद येथून जप्त केलेल्या स्फोटक पदार्थ अमोनियम नायट्रेट आणि इतर रसायनांच्या शेवटच्या बॉक्समधील नमुने तपासत असताना, जास्त प्रकाशामुळे बाहेरील उष्णता वाढली आणि स्फोट झाला.

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात फरिदाबादमधून जप्त केलेल्या सुमारे ३६० किलो अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट, सल्फर आणि इतर रसायनांबाबत श्रीनगरच्या नौगाम पोलिस ठाण्यात चौकशी सुरू होती. त्यानंतर, १४ नोव्हेंबर रोजी रात्री ११:२० वाजता, पोलिस स्टेशनमध्ये स्फोट झाला, ज्यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला आणि ३२ जण जखमी झाले. त्यांच्यावर ९२ आर्मी बेस आणि एसकेआयएमएस सौरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्फोटाच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये जवळपासच्या घरांच्या खिडक्या हादरताना दिसत आहेत. पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याचा अंदाज फेटाळून लावला.

### सुकम्यात सुरक्षा दलाची मोठी कारवाई

## तीन नक्षलवादी ठार



■ वृत्तसंस्था, सुकमा, दि. १६ :
छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातून सध्याची मोठी बातमी येत आहे. रविवारी सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. चकमकीदरम्यान सुरक्षा दलांनी तीन नक्षलवाद्यांना ठार केले. चकमकीनंतर पोलिसांनी ही माहिती जाहीर केली. नक्षलवाद्यांकडून शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. सध्या परिसरात तपास सुरू आहे.

एसपी किरण चव्हाण यांनी सांगितले की, आज सकाळी डीआरजीचे पथक बेज्जी आणि चिंतागुफा पोलिस स्टेशन परिसरातील डोंगराळ भागात गस्त घालत होते तेव्हा नक्षलवाद्यांशी चकमक सुरू झाली. सुरक्षा दलांना या भागात माओवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती, ज्याच्या आधारे नक्षलविरोधी ऑपरेशन सुरू करण्यात आले.

एसपींनी सांगितले की, चकमकीत आतापर्यंत तीन नक्षलवादी मारले गेले आहेत आणि ऑपरेशन अजूनही सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच, बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी सहा नक्षलवाद्यांना ठार केले. ही घटना मंगळवारी घडली. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्याच्या राष्ट्रीय उद्यान परिसरात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी सहा नक्षलवाद्यांना ठार केले. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे, स्फोटके आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात माओवाद्यांच्या उपस्थितीबद्दल माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव रक्षक विजापूर, दंतेवाडा आणि विशेष कार्य दल यांच्या संयुक्त पथकाने नक्षलविरोधी कारवाई सुरू केली. नक्षलवादाविरुद्धच्या या ताज्या कारवाईसह, या वर्षी छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २६२ नक्षलवादी मारले गेले आहेत. यापैकी २३३ नक्षलवादी बस्तर विभागात मारले गेले, ज्यामध्ये सुकमासह सात जिल्हे समाविष्ट आहेत, तर २७ इतर नक्षलवादी रायपूर विभागात येणाऱ्या गरियाबंद जिल्ह्यात मारले गेले. दुर्ग विभागातील मोहला-मानपूर-अंबागड चौकी जिल्ह्यात दोन नक्षलवादी मारले गेले.

## बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक न्यासाच्या अध्यक्षपदी उद्धव ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक न्यासाच्या अध्यक्षपदी माजी मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचप्रमाणे आदित्य ठाकरे यांचीही न्यासाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. २०१९ साली उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर तब्बल सहा वर्षांनी त्यांची पुन्हा या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर तसेच सोमवारी १७ नोव्हेंबर रोजी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

शिवाजीपार्क येथील महापौर बंगल्याची स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकासाठी निवड करण्यात आल्यानंतर स्मारक न्यासाची स्थापना उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली २०१६ साली करण्यात आली होती. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी न्यासाच्या अध्यक्षपदाचा २०१९ साली राजीनामा दिला होता. २०२२ साली एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत पडलेल्या फुटीमुळे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.




शिंदे सरकार अस्तित्वात आल्यानंतर अध्यक्षपदाची नियुक्ती करण्यात आली नव्हती. शिंदे सेनेचे नेते रामदास कदम यांनी तर उद्धव ठाकरे यांना हटवण्याची मागणी केली होती. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडील सामान्य प्रशासन विभागाकडून पुन्हा उद्धव ठाकरे यांची स्मारक न्यासाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्याचप्रमाणे आदित्य ठाकरे यांचीही सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# शालेय सहलीसाठी 'एसटीच्या' नवीन बसेस

## प्रताप सरनाईक यांची माहिती



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

'स्वस्त आणि सुरक्षित' प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा-महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की, शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या एकूण भाड्यामध्ये ५०% टक्के सवलत देते. त्यामुळे अतिशय मापक दरामध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो. अर्थात, यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्यभरात असलेल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा-महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान राज्यभरातील विविध शाळा-महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९ हजार ६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा (प्रतिपुर्ती रक्कमेसह ) महसूल प्राप्त झाला होता. यंदा देखील प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा-महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात बाबत आवाहन करण्यात येत आहे. आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा - महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी आवाहन करीत आहेत.

# काँग्रेसचा स्वबळाचा नारा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

मुंबई महानगरपालिका निवडणूक महायुती म्हणून एकत्र लढण्याची तयारी सुरू असतानाच महाविकास आघाडीत काँग्रेसने स्वबळावर ही निवडणूक लढण्याची घोषणा शनिवारी अधिकृतपणे केली. शिवसेना- मनसेची होणारी संभाव्य युती लक्षात घेता हिंदुत्व आणि मराठीच्या मुद्द्यावर होणारी फरफट रोखण्यासाठी काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे.

मुंबई काँग्रेसचे एक दिवसीय शिबिर मालाडमध्ये आयोजित करण्यात आले होते. त्यात मुंबईत स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी केली. या वेळी पक्षाचे राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सहप्रभारी यु. बी. व्यंकटेश, आमदार अस्लम शेख, मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झीनत शबरीन आदी उपस्थित होते.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे बंधू एकत्र येणार हे निश्चित झाल्याने मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने

## मुंबई महापालिका निवडणूक

एकत्र लढण्याची भूमिका घेतली आहे. शिवसेना, मनसेमुळे मराठी मतांचे ध्रुवीकरण होऊन आव्हान उभे राहू शकते याचा अंदाज भाजप नेत्यांना आला आहे. यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला बरोबर घेण्याची भाजपची भूमिका आहे.

महाविकास आघाडीने मनसेला बरोबर घेऊन निवडणूक लढविण्याची शिवसेना ठाकरे गटाची योजना होती. या दृष्टीने खासदार संजय राऊत यांनी दिल्लीतील काँग्रेस नेत्यांशी प्राथमिक चर्चा केली होती. काँग्रेसमध्ये स्वबळावर लढण्याचा मतप्रवाह होता. दिल्लीतील केंद्रीय नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर आज मुंबईत स्वबळावर लढण्याची घोषणा झाली.

स्वबळावर लढण्याचा निर्णय जाहीर केला तरीही काँग्रेस समविचारी पक्षांबरोबर आघाडी करणार आहे. यात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाशी संपर्क साधण्यात येणार आहे. रिपब्लिकन पक्षाचा गवई गट, डाव्या पक्षांबरोबर चर्चा करण्यात येणार आहे, असे पक्षाचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी सांगितले.

# वीज क्षेत्रातील संशोधन, तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी नॉलेज शेअरींग गरजेचे : संचालक सचिन तालेवार

## महावितरण व रामदेवबाबा विद्यापीठात करार




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

वीज क्षेत्राची व्याप्ती वाढत असल्याने नवीन संशोधन व तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी तसेच अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाला व्यावहारिक ज्ञानाची जोड देण्यासाठी नॉलेज शेअरींग ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार यांनी केले. महावितरण आणि नागपूर येथील रामदेवबाबा विद्यापीठ यांच्यामध्ये वीजक्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व घडामोडी, ज्ञानाचे आदानप्रदान आदींसाठी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मुख्य पाहुणे म्हणून संचालक सचिन तालेवार बोलत होते. या तीन वर्षांच्या सामंजस्य करारावर रामदेवबाबा विद्यापीठाकडून कुलगुरू डॉ. राजेश पांडे यांनी तर महावितरणकडून मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी स्वाक्षरी केली. यावेळी मुख्य अभियंता डॉ. मनीष वाठ (मुंबई) यांच्यासह विद्यापीठाचे विविध विभागप्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या सामंजस्य करारानुसार महावितरणच्या नागपूर प्रशिक्षण विभागाकडून रामदेवबाबा विद्यापीठाच्या विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना बदलते वीजक्षेत्र, महावितरणमधील आधुनिक तंत्रज्ञान आदींसह वीजक्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान प्रत्यक्षात जाणून घेता येणार आहे. त्यांना महावितरणच्या प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येईल व उद्योग-आधारित प्रकल्प करण्याची संधी मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या रोजगार क्षमतेत वाढ होईल.

तसेच रामदेवबाबा विद्यापीठातील नवीन संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती महावितरणच्या अभियंता, अधिकारी व तांत्रिक कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे तांत्रिक ज्ञान आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढेल. आधुनिक तंत्रज्ञानाची देवाणघेवाण झाल्याने वितरण प्रणाली अधिक स्मार्ट व कार्यक्षम होईल, ज्याचा फायदा थेट ग्राहकांना होईल. यासह महावितरणच्या कर्मचाऱ्यांची गुणवत्ता आणि कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी विद्यापीठाच्या मदतीने प्रशिक्षण विभागासाठी विशेष अभ्यासक्रम तयार केले जाणार आहे. या कराराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा पूर्णपणे ज्ञान-आधारित असून, कोणत्याही पक्षावर कोणतेही आर्थिक बंधन असणार नाही. याशिवाय या करारामुळे शैक्षणिक उत्कृष्टता आणि सार्वजनिक क्षेत्रातील सेवा पुरवठा यांच्यात मजबूत समन्वय निर्माण होईल, महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राला एक नवी दिशा मिळेल, अशी आशा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अमित ठाकरेंचा आक्रमक पवित्रा

## शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे आज नवी मुंबईच्या दौऱ्यावर असताना, नेरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण अनेक महिन्यांपासून झाले नसल्याचे आणि महाराजांची मूर्ती कापडाने झाकून ठेवल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हे पाहताच अमित ठाकरेंनी स्वतः पुतळ्याचे अनावरण केले. या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते आणि पोलिस व मनसे सैनिकांमध्ये झटापट झाल्याचे चित्रही दिसले.

या कृतीबद्दल बोलताना अमित ठाकरे म्हणाले की, जर माज्यावर याबद्दल कारवाई झाली, तर ती माज्या आयुष्यातील पहिली केस असेल. पण वेळ आली तर महाराजांसाठी अशा अनेक केसेस अंगावर घेईन, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला.

अमित ठाकरे म्हणाले, मी शाखा उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी या भागात आलो होतो. दरम्यान मला असे कळले की छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा चार महिन्यांपूर्वीच तयार झालेला आहे. त्यावर आता धूळ साचात आहे. हा पुतळा लोकांच्या मागणीवरून लोकांसाठी झाला आहे. मात्र सरकारमधल्या कुठल्याही नेत्याला अथवा मंत्र्याला महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करायला वेळ मिळत नसल्याचे दिसत आहे. पुतळ्यावर धूळ जमत असल्याचे मला बघवले नाही. म्हणूनच मी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले. पुढे बोलताना अमित ठाकरे म्हणाले, मला असे वाटते माज्यावर याबाबत कारवाई केली जाईल. माज्या राजकीय जीवनातील जी कुठली पहिली केस असेल ती महाराजांसाठी असेल .

# हेरिटेज बांद्रा किल्ल्यावर मध्यरात्री दारू पार्टी ठाकरे गटाचा भाजपवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

बांद्रा किल्ल्यावर मध्यरात्री झालेल्या दारूपार्टीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर मुंबईतील राजकीय वातावरण तापले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या, संरक्षित हेरिटेज स्थळांपैकी एक असलेल्या वांद्रे किल्ल्यावर दारूसह पार्टी झाल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला असून, या प्रकरणावरून सरकार, बीएमसी आणि उत्पादन शुल्क विभागावर तीव्र टीका करण्यात येत आहे. ठाकरे गटाचे नेते अखिल चित्रे यांनी हा व्हिडिओ एक्सवर शेअर करत राज्य सरकार, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावर सवाल उपस्थित केले आहेत. चित्रे यांनी या घटनेमागे भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे 'ढोंगी हिंदुत्व' आणि 'लबाड संस्कृती' असल्याचा घणाघात केला आहे.

अखिल चित्रे यांनी 'एक्स' समाज माध्यमावर पोस्ट करत ही घटना १६ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीची असल्याचे सांगितले. स्थानिकांनीच ही पार्टी चित्रित केल्याचा त्यांचा दावा आहे. चित्रे यांनी आपल्या पोस्टमध्ये प्रशासनाला थेट जाब विचारला आहेः "महाराष्ट्रातील किल्ल्यांवर हे काय सुरु आहे? पोतुर्गीजांनी बांधलेला आणि मराठा इतिहासाची साक्ष देणारा बांद्रा किल्ला या हेरिटेज स्थळी दारूची पार्टी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारचा उत्पादन शुल्क विभाग आणि BMC परवानगी देतातच कशी?" इतकेच नाही तर, या पार्टीच्या आयोजनात 'महाराष्ट्र पर्यटन' विभाग देखील सामील असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

या घटनेवरून चित्रे यांनी भाजपच्या राजकीय धोरणांवर सडकून टीका केली. ते म्हणाले, "राजधानी मुंबईतील उपेक्षित किल्ल्यांपासून सुरुवात करायची आणि बोभाटा झाला नाही, तर ह्याच दारू पार्ट्यांचे उपद्व्याप महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांवर करायचे. हेच भाजप आणि त्यांच्या नोकरपक्षांचं ढोंगी हिंदुत्व आणि लबाड संस्कृती आहे."

# सायबर चोरट्यांकडून ९७ लाखांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १६ :

सायबर चोरट्यांकडून वेगवेगळी आमिषे दाखवून नागरिकांची फसवणूक करण्याचे सत्र कायम आहे. शेअर बाजारात गुंतवणूक, घरातून ऑनलाइन कामाची संधी, तसेच कारवाईची भीती दाखवून चोरट्यांनी तक्रादारांची ९७ लाख ७६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कात्रज भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी २९ लाख ६९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत ज्येष्ठ नागरिकाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्थानिक निवडणुकीचा निर्णय स्थानिक स्तरावर : सुप्रिया सुळे



■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १६ :

सशक्त लोकशाहीमध्ये प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे.राधाकृष्ण विखे पाटील हे माज्यापेक्षा वयाने, पदाने मोठे आहेत पण एवढे असताना त्यांना शरद पवारांचे नाव घेत टीका करावी लागते म्हणजे आमचे नाणं मार्केटमध्ये चालते आहे. जर असे नसते तर विखे पाटील शरद पवारांवर बोललेच नसते, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्थानिक नेतृत्वाला युती आघाडीबद्दल जे योग्य वाटेल तो निर्णय घेतलेला आहे. पक्षाने त्यासाठी सुट दिली आहे. त्या पद्धतीने सर्व काम सुरू आहे. मंगळवारी पक्षाचे किती उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत हे स्पष्ट होईल.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आशिष शेलारांनी टीका केली ती त्यांची बोलायची स्टाईल आहे. लोकशाहीमध्ये फार काही कुणाचे मनावर घ्यायचे नसते. आम्ही राज्याची सेवा करण्यासाठी राजकारणात आलो आहे. लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबीयांशी आमचे चांगले संबंध आहेत त्यांच्या कुटुंबात काय सुरू आहे हे आम्हाला माहिती नाही. बिहार निवडणुकीचे श्रेय हे नितीशकुमारांचे श्रेय आहे. आम्हाला आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते त्यामुळे तिथे युती, आघाड्या बदलतात हे काही नवीन नाही. अनेक वेळा अशा गोष्टी होत असतात. अंजली दमानिया या अभ्यासपूर्वक आरोप करत असतात. त्यांना कोर्टात जाण्याचा अधिकार दिलेला आहे. ईडी ही स्वायत्त संस्था आहे. पण ईडीच्या मागे एक अदृश्य शक्ती त्याच्या मागे आहे. हा आरोप मी करत नाही कोटार्ने त्यांना फटकारले आहे. ईडीने अनेकांवर आरोप केले पण त्यात तथ्य नव्हते त्यावर कोटार्ने ताशेरे ओढले होते. संस्था चांगली असली तरी त्यामागील अदृश्य शक्तीमुळे हे सर्व होत असेल असे मला वाटते.

# मुंबईत मुलांच्या नेतृत्वाखालील स्वच्छता मोहीम



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १६ :

मुंबई क्लायमेट वीक 2025 च्या महत्त्वपूर्ण उपक्रमांचा एक भाग म्हणून प्रोजेक्ट मुंबईच्या वतीने जल्लोष क्लीन कोस्ट्स यांनी 15 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 7.30 ते 9.00 वाजेपर्यंत प्रभादेवी आणि जुहू कोळीवाडा किनारपट्टीवर मुलांसाठी खास बीच क्लीन-अप मोहीम राबवली. सकाळी लवकरच शहराच्या किनाऱ्यांवर पोहोचलेल्या शाळकरी मुलांच्या उत्साहामुळे संपूर्ण किनारपट्टीत नवा जोश निर्माण झाला. हातमोजे घालून, अमर्याद ऊर्जा आणि जबाबदारीची भावना बाळगून या छोट्या ग्रीन चॅम्पसनी स्वच्छतेचे काम हाती घेतले. शिक्षक, स्वयंसेवक आणि स्थानिक समुदायाच्या साथीत या मुलांनी एकत्रित प्रयत्नांनी शहरासाठी काय बदल घडवता येऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण घालून दिले.

केवळ 90 मिनिटांत मुलांनी 350 हून अधिक पिशव्यांमध्ये प्लास्टिक कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण केले.

मुंबईच्या सागरी पर्यावरणाच्या रक्षणासाठी त्यांची असलेली निष्ठा यावरून स्पष्ट होते. गोळा केलेला सर्व प्लास्टिक कचरा आता प्रोजेक्ट मुंबईच्या माध्यमातून पुनर्वापरासाठी पाठवण्यात येणार असून त्यापासून टी-शर्ट, बाक, कंपास बॉक्स आणि इतर उपयुक्त वस्तू तयार केल्या जातील. यामुळे कचऱ्याचे किमती वस्तूंमध्ये रूपांतर कसे होते, याचा थेट अनुभव मुलांना मिळणार आहे.

यामुळे मुंबई क्लायमेट वीकचे उद्दिष्ट–विशेषतः मुलांमध्ये जागरूकता वाढवून, अधिक स्वच्छ, दयाळू आणि हवामान-तयार मुंबई घडवण्यासाठी नागरिकांना सक्षम करणे–याला अधिक बळ मिळाले.

# आदिवासी विकास महामंडळ निवडणुकीत झिरवाळ, गावित गटाचा दणदणीत विजय



■ महासागर प्रतिनिधी, मालेगाव, दि. १६ :

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक पदाच्या १७ जागांसाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी रविवारी पार पडली. त्यात औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व माजी आमदार जीवा पांडू गावित यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने नाशिक गटातील दोन्ही जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. हा निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.

या-ना-त्या कारणाने आदिवासी विकास महामंडळ संचालकांची पंचवार्षिक निवडणूक लांबल्याने गेल्यावेळी पाच वषार्साठी निवडून दिलेल्या संचालकांनी तब्बल १७ वर्षे कारभार बघितला. एवढ्या अवधीनंतर झालेल्या या निवडणुकीत त्यामुळे मोठी चुरस निर्माण झाल्याचे बघावयास मिळाले. मातब्बर उमेदवार व नेत्यांची प्रतिष्ठा त्यामुळे पणास लागली होती. महामंडळाच्या नाशिक जिल्ह्यातील दोन जागांसाठी सहा उमेदवार रिंगणात होते व दोन पॅनेल्स एकमेकांच्या विरोधात उभे होते. औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे चिरंजीव गोकुळ झिरवाळ व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व माजी आमदार जीवा पांडू गावित यांचे चिरंजीव इंद्रजित गावित हे त्यात विजयी झाले आहेत. १६३ पैकी झिरवाळ यांना सर्वाधिक १०७ तर गावित यांना ८९ मते मिळाली. विरोधी पॅनलचे माजी आमदार शिवराम झोले व विलास गवळी यांना मात्र या निवडणुकीत दारुण पराभव स्वीकारावा लागला आहे.

शुक्रवारी महाराष्ट्रातील १६ वेगवेगळ्या केंद्रांवर हे मतदान झाले होते. रविवारी सकाळी ९ वाजता नाशिक येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य इमारतीत मतमोजणी सुरू झाली. या निवडणुकीसाठी राज्यातील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी याप्रमाणे एकूण ८२४ मतदार होते. नाशिक जिल्ह्यातील संचालकांच्या दोन जागांसाठी सर्व १६३ संस्थांच्या प्रतिनिधींनी मतदानाचा हक्क बजावला होता.

या निवडणुकीत विजयी झालेले अन्य उमेदवार व त्यांचा मतदार संघ पुढील प्रमाणे : सुनील भुसारा व दिलीप पटेकर (पालघर व ठाणे), देवमन पवार व तानाजी वळवी (नंदुरबार,धुळे व जळगाव), अशोक मंगाम (यवतमाळ व नांदेड), भरतसिंग दूधनाग व रमेश ताराम (नागपूर,भंडारा वर्धा व गोंदिया), मंगेश धाडसे (चंद्रपूर), गोपाल उईके, सैनु गोटा व यशवंत चौरीकर (गडचिरोली), शितल मडावी व मीनाक्षी वटी (महिला राखीव). पुणे रायगड व अहिल्यानगर मतदार संघातील वैभव पिचड तसेच अमरावती मतदार संघातील केवलराम काळे हे अविरोध निवडून आले आहेत. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, संभाजी निकम यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम बघितले.

# बागेश्वर धामच्या नावाने २४ लाखाची फसवणुक

■ महासागर प्रतिनिधी
उल्हासनगर, दि. १६ :

उल्हासनगर कॅप ४ येथे राहणाऱ्या एका वृध्द महिलेच्या एकटे पणाचा फायदा घेत सात महिला पुरुषानी बागेश्वर धाम येथील बाबाच्या पुजेसाठी होम हवन करुन दान धर्म केल्याने विग्न दुर होतात असे भासवुन त्या महिलेचे रोख १० लाख रुपयासह ८ तोळे सोने , १० ग्रॅमचे हिरे घेवुन असे एकुण २४ लाख ६० हजार रुपयाची फसवणुक केल्या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात सात जणाविरुध्द गुन्हा दाखल झाला असुन यामध्ये दोन महिलांचा सामावेश आहे. उल्हासनगर कॅप ४ येथील शिवनेरी हॉस्पिटल जवळ शकुंतला बुलचंद आहुजा ७० ही वृध्द महिला एकटीच राहते, तेव्हा तिच्या ऐकटे पणाचा फायदा घेत यातील आरोपी करिष्मा व तिच्या सहकाऱ्यानी आपसात संगनमत करुन त्या महिलेला घर घेण्यास भाग पाडुन तिच्या कडुन १० लाख रुपये घेतले. ते पैसे परत मिळवन्यासाठी आणि विग्न दुर करण्यासाठी बागेश्वर धाम येथील बाबा यांच्या पुजेसाठी होम हवन करुन दान धर्म केल्यावर विग्न दुर होते. महिलेकडुन कलशमध्ये ह सोने टाकन्यास भाग पाडले.

# सोलापूरच्या राजकारणात मोठा खेळ सुरू?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

सोलापूरच्या महानगरपालिका निवडणुकांची चाहूल लागताच शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. विविध पक्षातील हालचाली, समाजगटांचे बदलते समीकरण, आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाढत्या सक्रियतेमुळे आगामी निवडणुका अत्यंत चुरशीच्या ठरणार हे स्पष्ट होत आहे. या साऱ्या घडामोडीत विधानसभा उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्ह्याचे सह संपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी एका निर्णायक बैठकीत अब की बार 75 पार हा आक्रमक नारा देत पक्ष कार्यकर्त्यांत नवा उत्साह निर्माण केला आहे.

सह संपर्क मंत्री म्हणून निवडीनंतर बनसोडे यांनी प्रथमच शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांसोबत स्वतंत्र आढावा बैठक घेऊन सोलापूरच्या राजकारणात मोठा खेळ सुरू झाल्याचे संकेत दिले. शहरातील संघटनात्मक स्थिती, प्रलंबित विकासकामे, पक्षविस्तार, आणि सामाजिक समीकरणांचा विस्तृत आढावा घेताना आगामी निवडणुकीसाठी पक्की रणनीती आखण्यात आली. बैठकीत



## अण्णा बनसोडेंचा नवा फॉर्म्युला

शहरातील रखडलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाशी तातडीने बैठक घेण्याची मागणी झाली. करदात्यांना सुविधा देण्यात होत असलेल्या विलंबाबद्दल पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. लिंगायत, पद्मशाली, बौद्ध, मुस्लिम तसेच सर्व समाजांना सोबत घेऊन शहराचा सर्वांगीण विकास करणार असल्याची स्पष्ट ग्वाही बनसोडे यांनी दिली. पुणे-पिंपरी चिंचवडचे विकास मॉडेल सोलापूरमध्ये लागू करण्याची मागणीही त्यांनी मांडली. महात्मा बसवेश्वर स्मारक आणि वीरशैव लिंगायत भवनासाठी अतिरिक्त निधी मिळावा, असेही पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. शहरात वार्डनिहाय बैठकांचे आयोजन, नियमित दौरे आणि नव्या कार्यकर्त्यांना प्राधान्य देऊन पक्ष अधिक बळकट करण्याची जबाबदारी बनसोडे यांनी स्वीकारली. सोलापूरच्या विकासासाठी ज्यांचा साथ असेल, त्यांच्यासोबतच निवडणूक लढवू, असे महत्त्वाचे विधान बैठकीत करण्यात आले.

बसपा, काँग्रेस, अक्टक्ट, भाजप यांसह विविध पक्षातील नगरसेवकांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाढते प्रवेश लक्ष वेधून घेत आहेत. आणखी काही जण संपर्कात असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. सह संपर्क मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल पदाधिकाऱ्यांनी अण्णा बनसोडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

# डॉ.भाभा आण्विक संशोधन केंद्राकडील कृषी तंत्रज्ञान महाबीजकडे हस्तांतरित



■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
महाबीजचे जैविक रोपांचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत असून, त्यामध्ये शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार नविन उत्पादनांचा अंतर्भाव करून हा व्यवसाय वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने डॉ. भाभा आन्विक संशोधन केन्द्र, मुंबई (बीएआरसी) यांच्याकडून विविध पाच प्रकारचे तंत्रज्ञान १४ नोव्हेंबररोजी डॉ. भाभा आन्विक संशोधन केन्द्र, मुंबई येथे आयोजीत कार्यक्रमात महाबीजकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. यामध्ये म्युटेशन तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करून विकसित केलेली जैविक बुरशीनाशक

## पाच प्रकाराच्या तंत्रज्ञानाचा समावेश

ट्रायकोडर्मा व्हायरेन्स, वेस्ट डिकांपोझर, कडुलिंब जैब कीटकनाशक, मातीतील सेंद्रिय कर्ब परिक्षण व ऊती संवर्धन केळी प्रोटोकॉल या पाच प्रकारचे कृषी तंत्रज्ञानाचा समावेश आहे. महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालीका श्रीमती बुवनेश्वरी एस. तसेच डॉ. हसन, सहयोगी संचालक व डॉ. आनंद बल्लाळ, अध्यक्ष नाभिकीय कृषी व जैव प्रौद्योगिकी विभाग, डॉ. भाभा आन्विक संशोधन केन्द्र, मुंबई यांचे प्रमुख उपस्थितीत डॉ. भाभा आन्विक संशोधन केन्द्र, मुंबई येथील तंत्रज्ञान हस्तांतरण प्रमुख डॉ. डॅनीयल बाबू व महाबीजमार्फत डॉ. प्रफुल्ल लहाने, महाव्यवस्थापक यांनी (गुनि संशोधन) यांनी सदर तंत्रज्ञान हस्तांतरण करारावर स्वाक्षरी केल्या. तंत्रज्ञान हस्तांतरण करतांना महाबीजतर्फे महाव्यवस्थापक उत्पादन विवेक ठाकरे, महाव्यवस्थापक (विपणन) विजयराव देशमुख, बिजपरीक्षण अधिकारी, आर आर पाटील, विभागीय व्यवस्थापक (गुनि), डॉ. प्रशांत घावडे उपस्थित होते.

# पोलीस स्टेशन हिवरखेडच्या पथकाकडून गुन्हेगारास तडीपार करण्याची कारवाई

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :



अकोला जिल्ह्यात मालमत्ता व शरीराविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल असलेल्या एका जाबदेणारास महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (१) (अ) अंतर्गत जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.हिवरखेड पोलिसांनी ग्राम सौदळा येथील जाबदेणार मनिष तेजराव वानखडे याच्याविरुद्ध अनेक गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल असून, त्याच्यावर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करूनही त्याच्या वर्तनात कोणताही बदल दिसून आला नव्हता. त्यामुळे त्यास जिल्ह्यातून हद्दपार करण्यासाठी प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत उपविभागीय दंडाधिकारी, अकोट यांच्याकडे सादर करण्यात आला. उपविभागीय दंडाधिकारी यांनी सदर प्रस्ताव मान्य करून दि. १३/११/२०२५ ते दि. ३१/०५/२०२६ या कालावधीत मनिष वानखडे यास अकोला जिल्हा तसेच जिल्ह्याला लागून असलेल्या तालुक्यांच्या हद्दीबाहेर जाण्याचे आदेश दिले. आदेशानुसार त्या इसमाचा अकोला जिल्ह्यातून तडीपार करण्यात आला आहे.ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बि. चंद्रकांत रेड्डी, श्री. निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे.

# पोलीसांची आगामी नगर पंचायत निवडणुक अनुषंगाने
# अकोला पोलिसांची आकस्मिक नाकाबंदी मोहीम



## खुल्या जागेत दारु पिणाऱ्या ९३ इसमांविरुध्द कारवाई

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
अकोला जिल्ह्यात आगामी नगर पंचायत निवडणुक अनुषंगाने नागरिकांना सुरक्षित आणि शांततामय वातावरण मिळावे त्याकरीता मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक यांचे निर्देशानुसार जिल्हयात आकस्मीक नाकाबंदी चे आयोजन करण्यात आले होते.सदर नाकाबंदी दरम्यान पोलिस विभागाच्या वतीने दिनांक १५.११.२०२५ चे १९.०० वा ते २४.०० पावेतो आकस्मीक नाकाबंदीचे आयोजन करून तसेच विशेष पथके तयार करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिउन गोंधळ घालणे, शांतता भंग करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ९३ इसमांवर मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्यात आली. तसेच संपुर्ण जिल्हयात नाकाबंदी राबवुन, नाकाबंदी दरम्यान जिल्हयातील एकुण ४० नाकाबंदी पॉईट वर १२४८ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये २४० कारवाई करून १,४२,५००/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. दारू बंदी अधिनीयम अंतर्गत ०४ केसेस व कोटपा कायद्यान्वये ०२ केसेस करण्यात आल्या आहेत. नाकाबंदी दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी नाकाबंदीच्या ठिकाणी भेटी दिल्या



तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांनी नाकाबंदी मध्ये सक्रीय सहभाग घेवुन प्रभावी नाकबंदी करण्यात आली आहे.निवडणुकीच्या पार्श्वभुमी वर जिल्हयात शांतता राहावी याकरिता बेकायदेशीर कृत्यांपासून नागरीकांनी दूर राहावे, आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अकोला पोलिसांकडून अशा प्रकारचे विविध प्रतिबंधक उपयोजना अधिक तीव्रतेने राबवुन, कायदा मोडणाऱ्यांवर कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही. करीता सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि शहराच्या शांततेत योगदान द्यावे व नागरिकांच्या सहकाऱ्यानेच जिल्हयात शांतता व सुव्यवस्था राखली जाऊ शकते, असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी केले आहे.

# थोडक्यात

## बालकास केले आईच्या स्वाधीन

**अकोला :** कौटुंबिक वादातून आपल्या आईपासून तोडण्यात आलेल्या लहान बालकास पुन्हा त्याच्या आईच्या स्वाधीन करण्याचा प्रयत्न इन्कलाब सेवा समिती सामाजिक न्याय केंद्राने केला. चांदखाँ परिसरातील महिलेच्या काही वादामुळे तिच्या लहान मुलास नेण्यास आले होते.सदर महिलेने इन्कलाब सेवा समितीच्या माध्यमातून जिल्हा पोलीस अधिक्षक यांनातक्रार करून आपल्या पुत्रास आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली होती. या संदर्भात इन्कलाब सेवा समिती सामाजिक न्याय केंद्राचे अध्यक्ष मो. एजाज मो. ताहेर यांनी समेट घडवून हा वाद मिटवून त्या मातेच्याबालकास तिच्या स्वाधीन करण्यासाठी प्रयत्न केले. यात पोलीस कर्मचारी वीरेंद्र खेर्डे व समितीचे पदाधिकारी फिरोज पठान यांनी मेहनत घेतली. या संदर्भात शांततेत हा समेट झाला असल्याची माहिती जुने शहर पोलीस ठाण्याला देण्यात आली.एका कौटुंबिक वादातून चिमुकल्याची होत असलेली वाताहत पाहून सामाजिक संस्थेन याप्रकरणात पुढाकार घेतला.

## विवाहितेचा विनयभंग युवराविरुद्ध गुन्हा दाखल

**मूर्तिजापूर :** स्थानिक सिटी पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या २६ वर्षीय युवतीच्या इच्छेविरुद्ध फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत विनयभंग करणाऱ्या युवकाविरुद्ध विवाहितेने दिलेल्या फिर्यादीनुसार सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्राप्त माहितीनुसार फिर्यादी हिने दिलेल्या फिर्यादीनुसार योगेश शिवाजीराव कदम हा युवक सदर विवाहितेची इच्छा नसताना वैयक्तिक संबंध स्थापित करण्याच्या वाईट उद्देशाने वारंवार विविध मोबाइल नंबरवरून कॉल करून विनयभंग करून, तुझे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करेल, तसेच तुझ्या अंगावर ॲसिड टाकून जीवे मारेल, अशी धमकी देत मानसिक त्रास देत होता. तसेच फिर्यादी विवाहितेच्या पतीससुद्धा कॉलवर जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या फिर्यादीवरून आरोपी योगेश शिवाजीराव कदम (२७) रा. मुळावा ता. उमरखेड हल्ली मुक्काम कर्वे नगर पुणे याच्या विरुद्ध कलम ७८, ३५१ (२), ३५१ (३) ३५२ बीएनएस नुसार सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय गजानन थाटे करीत आहेत.

## नेहरू जयंती साजरी

**अकोला :** शिवतेज प्रतिष्ठान अकोला यांचे वतीने पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे जयंती निमित्य कार्यक्रम आयोजीत करण्यात आला त्यात योगगुरू मनोहर इंगळे यांनी नेहरूंच्या जिवनावर प्रकाश टाकला व त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे पुतळ्यास माल्यार्पण करून सर्व योग साधकांनी आदरांजली वाहली.

# निवडणूक निरीक्षक सुधीर खांदे यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी

■तेल्हारा,दि १६ (प्रतिनिधी) :
नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने निरीक्षक अप्पर जिल्हाधिकारी बुलढाणा सुनील खांदे यांनी १४ नोव्हेंबर रोजी तेल्हारा येथे मतदान केंद्रांना भेटी देऊन, डॉ. केशव बळीराम हेडगेवार, भवनातील स्ट्राँग रूम तसेच तेल्हारा नगरपरिषद कार्यालयातील दुसऱ्या माळ्यावरील विशेष कामकाज कक्षाला भेट देऊन काम काजाची प्रत्यक्षपाहणी केली.

तेल्हारा नगर परिषद नगराध्यक्षपदासाठी थेट जनतेतून तर २० सदस्य पदाच्या जागांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.

१७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार असून, १८ नोव्हेंबरला अर्जांची छाननी होणार आहे. २१ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत तर २६ नोव्हेंबरला उमेदवारांची अंतिम यादी प्रकाशित केली जाणार आहे. तेल्हारा नगरपालिका कार्यक्षेत्रात आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून घेतले जात असून



निवडणूक निर्णय अधिकारी तथा तेल्हारा तहसीलदार समाधान सोनवणे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तेल्हारा नगरपरिषद मुख्याधिकारी सतीश गावंडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस विभागाच्या सहाय्याने स्थिर निरीक्षण पथके तसेच भरारीपथकातील अधिकारी व कर्मचारी कर्तव्य बजावण्यास सज्ज असल्याचे वृत्त आहे.

स्थिर निगराणी पथकातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांकडून प्रत्येक वाहनाची ऑन कॅमेरा तपासणी पथके तयार करण्यात आल्याचेही समजते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार समाधान सोनवणे, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नगरपरिषद मुख्याधिकारी सतीश गावंडे, तेल्हारा पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांची उपस्थिती होती.

# सौरमीटर बिले न मिळाल्याने वीज कंपनीला दंड !

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
अकोला: सौरऊर्जेची बिलेन मिळाल्याने अकोल्यातील कैलास इंदरमल मुरारका यांनी राज्य वीज वितरण कंपनी (म हावितरण) विरोधात दाखल केलेल्या तक्रारीवर वीज ग्राहक तक्रार निवारण मंचाने संबंधित एजन्सीला ५०० रुपये दंड करावा, असा आदेश महावितरणला दिला आहे. आदेशाची अंमलबजावणी एका महिन्यात करण्याचेही बजावले आहे. मुरारका यांनी एप्रिल- २०२५ म ध्ये त्यांच्या घराच्या छतावर नेट मीटरसह सौरऊर्जा प्रणाली बसवली. मात्र, एप्रिल ते सप्टेंबर-२०२५ या कालावधीत त्यांना अचूक वीज बिले न मिळता सरासरी बिलांची आकारणी करण्यात आली. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर सप्टेंबरम ध्येच योग्य बिल देण्यात आले. त्याचबरोबर ग्राहकाच्या सिक्युरिटी डिपॉझिटमधील रक्कम शून्य दाखविण्यात आली, ज्याची ग्राहकास माहिती नव्हती. प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान महावितरणच्या प्रतिनिधीने नेट मीटर बसविल्यानंतरही डेटा एकत्रीकरणाचे काम एजन्सीकडून वेळेत पूर्ण झाले नाही, त्यामुळे तात्पुरती ५०० रुपये दंड संबंधित एजन्सीला करावा असा आदेश दिला सरासरी बिले देण्यात आली. नंतर ऑक्टोबरमध्ये ग्राहकाला ३९,००० रुपयांचा स्लॅब लाभ देऊन बिल समायोजन केल्याचे सांगितले.मंचाच्या निरीक्षणानुसार, ही चूक महावितरणकडून नेमलेल्या 'एएमआयएसपी एजन्सी जिनस प्रा. लि. 'च्या निष्काळजीपणा मुळे झाली. त्यामुळे संबंधित एजन्सीला ५०० रुपये दंड आणि आदेशाची अंम लबजावणी एका महिन्यात करावी, असा आदेश मंचाचे अध्यक्ष अध्यक्ष ओमप्रकाश भुतडा, तांत्रिक सदस्य धीरज चव्हाण, सदस्य वर्षा नेरकर यांनी दिला.

# आता वीज बिलावरचे नाव बदलता येणार!

बाळापूर : घर खरेदी- विक्री, वारसा हक्क, घरभाडेपट्टा, विभाजन यासारख्या कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये मालकाचे नाव बदल्यानंतर वीज बिलावरील ग्राहकांचे नावही बदलणे आवश्यक होते. यासाठी नागरिकांना महावितरणाच्या कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असत. मात्र, आता ही प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी महावितरणने ऑनलाइन अर्ज स्वयंचलित मंजुरीसह सुरू केला असून, तीन ते सात दिवसांत नावातील बदलाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. महाविरतणच्या कामाकरिता नागरिकांना बराच त्रास सहन कराता लागतो. ग्राहकांकडून ज्या प्रमाणात पैसे आकारले जातात, त्या प्रमाणात सेवा मिळत नसल्याची ओरड असते. नाव बदलासह इतर डिजिटल सेवांचाही वापर ग्राहकांकडून वाढत आहे. मागील काही महिन्यांत वीज लोड वाढविण्यासाठी महावितरणला ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी बहुतेकांना मंजुरी देण्यात आली आहे. महावितरणने कन्झुमर

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Company Limited

नेम चेंज ही सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकांना आता कार्यालयात जाण्याची गरज नाही. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून फी भरल्यानंतर नावातील बदलाची प्रक्रिया घरबसल्या पूर्ण करता येणार आहे. महाविरणच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी, न्यू कनेक्शन रेंज ऑफ नेम, पर्याय निवडावा, ग्राहक क्रमांक व मोबाइल नंबर टाकून लॉगिन करावे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. निर्धारित शुल्क भरून अर्ज सबमिट करावा. अर्जाची प्रणालीद्वारे प्राथमिक छाननी केली जाईल. कागदपत्रे योग्य असल्यास मानवी हस्तक्षेप न करता अर्जाला स्वयंचलित मंजुरी मिळणार आहे.

# 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे नव्या पिढीच्या वधूसाठी 'प्रथा' संग्रह सादर

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.

या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे. प्रत्येक दागिन्याच्या डिझाईनमध्ये पारंपरिक नक्षीकाम आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर मिलाफ दिसून येतो, जो आजच्या आत्मविश्वासू आणि समंजस वधूंसाठी खास तयार करण्यात आला आहे.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय



संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक डिझाईन वधूच्या नव्या प्रवासाची सखी बनावी, या उद्देशाने तयार केली आहे. या मोहिमेद्वारे आम्ही केवळ दागिने नव्हे, तर प्रत्येक विवाहामागील भावना, बांधिलकी आणि एकतेचा सुंदर उत्सव साजरा करतो.'

विवाह हंगामाच्या निमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५ टक्के पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ० टक्के कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.

'प्रथा' कलेक्शनमध्ये भारतीय पारंपरिक कलाकुसरीचा वारसा जाणवतो, नव्या काळासोबत चालत असताना आपली मुळे जपायची आहेत, अशा महिलांसाठी हा संग्रह खास आहे. ठरावीक कालावधीसाठी चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व शोरूम्समध्ये ग्राहकांची वर्दळ वाढवणे आणि ब्रँडशी असलेलं नातं अधिक दृढ करणे आहे. या उपक्रमातून पुन्हा एकदा ब्रँडचा नवकल्पना, कौशल्य आणि विश्वास या १९२ वर्षांच्या प्रवासात जपलेला वारसा अधोरेखित होतो.

# श्यामबाबाच्या भजनांनी दुमदुमून गेले सालासार मंदिर





■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
स्थानिक गंगानगर येथील सालासर बालाजी मंदिर शनिवारी श्यामबाबाच्या संगीतमय भजनांच्या सुरांनी दुमदुमून गेले. ओल्डसिटी परिवाराच्या वतीने आयोजित श्यामबाबा जन्मोत्सव भजन संध्यात भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. कडक थंडीतही महिला, पुरुष आणि युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्याम भजनांचा आनंद लुटला.या भजन संध्येत इंदूरचे प्रसिद्ध गायक शुभम राणा, नागपूरच्या भजन गायिका कृष्णप्रिया आणि स्थानिक गायक राम देशपांडे यांनी सहभाग घेतला. त्यांनी संगीतकारांच्या साथीत श्यामबाबांच्या अवतारकार्यावर आधारित सुंदर भजने सादर करून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.या उत्सवात भजनांच्या तालावर भाविकही थिरकले.ओल्डसिटी परिवाराने पहिल्यांदाच सालासर बालाजी, राणी सती दादी, माता शाकभरी आणि जिण माता यांच्या कृपेने हा भजन उत्सव आयोजित केला होता, ज्याला भाविकां कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कलाकारांच्या आगमनावेळी त्यांच्या स्वागतासाठी भव्य आतषबाजी करण्यात आली आणि शाल, श्रीफळ अर्पण करून सन्मानित करण्यात आले.उत्सवात खाटू नरेश श्यामबाबांचा दिव्य दरबार उभारण्या त आला होता. तसेच स्वयंभू बोरगाव नरेश ज्योति दर्शन, राणी सती दादी दरबार, सालासर बालाजी दरबार आणि श्याम दरबार यांची नयनरम्य झांकी साकारली होती. दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. कार्यक्रमातील तोरणद्वार विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. भाविकां साठी दर्शन आणि पूजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती, तर उपवास धारक भक्तांसाठी चहा-फराळाची सोय करण्यात आली होती. रात्रभर सुरू असलेल्या या भजन संध्येचा भव्य महाप्रसादाने समारोप झाला. शेकडो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. दुरदूरहून भक्त या उत्सवात सहभागी झाले होते.सर्व भक्तांचे ओल्ड सिटी परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले.

# शिक्षकाचा सेवापूर्ती कार्य गौरव सोहळा होणे त्यांच्या कार्याची पावती : ॲड. जयवंतराव पाटील



■तेल्हारा,दि १६ (प्रतिनिधी) :
येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका प्रेरणा सुहासराव कराळे (सावरकर) ह्या वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत. प्रत्येक शिक्षकाचा सेवापूर्ती कार्य गौरव सोहळा होणे ही त्यांच्या कार्याची पावती असते, असे विचार ॲड. जयवंतराव पाटील यांनी व्यक्त केले.प्रेरणा कराळे यांच्या सेवापूर्ती कार्य गौरव सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. गजाननराव पुडकर उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा श्री शिवाजी हायस्कूल, तेल्हारा जि. सेवापूर्ती का देव संस्था अमरावती हे होते. विशेष अतिथी म्हणून ॲड. जयंतराव पाटील (पुसदेकर) उपाध्यक्ष, केशवराव मेतकर उपाध्यक्ष, हेमंतराव काळमेघ कार्यकारिणी सदस्य, प्रा.केशवराव गावंडे कार्यकारिणी सदस्य, सुरेश खोटरे कार्यकारिणी सदस्य, प्रा सुभाषराव बनसोड कार्यकारिणी सदस्य, सुनिता तळोकार गटशिक्षणाधिकारी, वसंतराव खोटरे माजी आमदार, कमलाबाई सावरकर माजी प्रभाकरराव मुख्याध्यापिका, अतिथी म्हणून सर्व आजिव सदस्य डॉ. बबनराव चौधरी नागपूर, प्रा. अण्णासाहेब ढोले, दादासाहेब पाटील, बाळासाहेब पाटील मार्क, पुरुषोत्तम पाटील, रमेश कोकाटे, मुन्ना मिर साहेब, आरिफ अली मिरसाहेब, ॲड. विश्वासराव नेरकर, साहेबराव सोनमाळे, सुरेश पाटील आढे, मधुसूदन खोटरे, माधवराव खोटरे, नारायण देवतळे, सुधीर देशमुख शाळा समिती सदस्य तर प्रमुख उपस्थिती होती.

# मूर्तिजापुरातील गोयंका नगरात घरफोडी!

**मूर्तिजापूर :** शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या गोयंका नगर परिसरात १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दरवाजाची कडी उघडून घरफोडी केली. या घटनेत सुमारे ५३ ग्रॅम सोन्यासह रोख १४०० रुपये असा एकूण २ लाख ९२ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. सचिन गजानन जाधव (३९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पो. स्टे मूर्तिजापूर शहर येथे कलम ३०५, ३३१ (४) भा. न्या. संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्राप्त माहितीनुसार १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२.०१ ते पहाटे २.४५ वाजेदरम्यान घडली. फिर्यादी व त्यांचे नातेवाईक घरात झोपेत असताना, चोरट्यांनी घराच्या मागील दरवाजावरील कडीच्या खाली छिद्र पाडून दरवाजा उघडला. त्यानंतर बेडरूममधील लोखंडी कपाट उचकटून ३८ ग्रॅम सोन्याची पट्टा पोथ, सोन्याच्या अंगठ्या, कानातील टाप्स, रिंग व नगदी असा मौल्यवान ऐवज चोरला. फिर्यादीच्या जबानीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रभाकर नागे पुढील तपास करत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, चोरट्यांचा लवकरच शोध लावला जाईल.

# संपूर्ण ब्रह्मांडाच्या शक्तीचे केंद्र म्हणजे माता भुवनेश्वरी होय : पु मकरंद बुवा

## देवी भागवत कथेत मातृशक्तिची गर्दी

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
संपूर्ण चराचर सृष्टी व ब्रह्मांडाचे तारणहार ब्रह्मा, विष्णू, महेश यांना सुद्धा ज्या शक्तीचे आकलन करता आले नाही, ज्या शक्तीच्या आकलनासाठी त्यांनी अनादी व अनंत ब्रह्मांडाच्या सर्व कानाकोपऱ्यात संचार केला, अशा ब्रह्मांडाच्या नायिकेची व्याप्ती सर्व चराचरात असून ही शक्तीची नायिका अर्थात साक्षात भुवनेश्वरी देवी असून ती सकल ब्रम्हांडाच्या ऊर्जा व शक्तीचे केंद्र असल्याचे प्रतिपादन देवी भागवत कथाकार पु मकरंद बुवा सुमंत रामदासी यांनी केला.देवी भागवत कथा आयोजन समितीच्या वतीने योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराज यांच्या कृपेने व स्व डॉ टी व्ही कुलकर्णी यांच्या स्मृतीत स्थानिक मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात सुरू असलेल्या देवी भागवत कथेत पु मकरंद बुवा यांनी कथेचे तृतीय पुष्प गुंफले. ते म्हणाले, ब्रह्मदेव, विष्णू व महादेव हे सर्व चराचर व देवांचे अधिपती आहेत. पण आपल्यावर कोण नियंत्रण ठेवते हा प्रश्न या त्रिकूटांना झाला. वास्तविक या अफाट विश्वाच्या व अनंत कोटी ग्रहताऱ्यांच्या विश्वात आपण कोठे आहोत, याच्या खात्रीसाठी या त्रिदेवांनी सृष्टीच्या त्रिलोक्यात संचार केला. ग्रहमालेच्या पलीकडे गेल्यावर तिथे पुष्कळ विष्णू त्यांना दिसले. पुढे अनेक शिव व ब्रह्मदेव ही त्यांना दिसलेत. त्यांनी अंतराळाच्या अनेक आकाशगंगेत संचार केला. अंतिम टप्प्यात पोहोचल्यावर तेथे एक दिव्य ज्योत त्रिदेवांना दिसली. त्यानंतर पुढे गेल्यावर त्यांची स्त्री रूपे होऊन त्यांना रत्नजडीत सिंहासनावर आपल्या गळ्यात अनंत तारकांचा हार घातलेली माता दिसली. या त्रिदेवांनी त्या मातेचे दर्शन घेतले. अनंत कोटी जगदंबा त्यांना या माध्यमातून दिसून येऊन ब्रह्मा,विष्णू,महेश हे लहान बालके होऊन आदिमाया जगदंबा ही त्यांची आई झाली असल्याचे आपल्या प्रवचनात मकरंद बुवा यांनी वेदव्यास यांनी राजा जनमेजय यांना देवी भागवत कथा सांगताना ही बाब सांगितली असल्याचे आपल्या प्रवचनात सांगितले. या सत्रात पू मकरंद बुवा यांनी आकाशगंगेची खोल व्याप्ती विशद केली.



# अकोल्यात डेंग्यू चिकनगुनियाचा कहर!

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
अकोला शहरात सध्या डेंगू व चिकनगुनियाच्या साथीचा मोठा प्रादुर्भाव झाला असून, आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण आला आहे. शहरातील जवळपास सर्वच दवाखाने रुग्णांनी गच्च भरले असून, १०० टक्के खाटा व्यापलेल्या आहेत. खासगी तसेच सरकारी दवाखाने रुग्णांनी फुल्ल असून, नागरिकांना उपचारासाठी जागा मिळणेही कठीण झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून डासांच्या प्रचंड वाढलेल्या उत्पातामुळे आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. पावसाळ्यामुळे साचलेल्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने डासांच्या प्रजननाला खतपाणी मिळाले आहे. परिणामी शहरातील जवळपास प्रत्येक प्रभागात डेंगू व चिकनगुनियाचे रुग्ण आढळून येत आहेत. या परिस्थितीतही अकोलामहानगरपालिका यंत्रणा ठोस पावले उचलताना दिसत नाही. शहरातील अनेक भागांत गटारे साफ न झाल्यामुळे व पाणी साचल्यामुळे डासांची पैदास वाढली आहे. नागरिकांना जंतुनाशक फवारणी व नियमित स्वच्छता मोहीम न झाल्याची तीव्र खंत आहे. या गंभीर पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक निलेश देव यांनी संताप व्यक्त केला. निलेश देव यांची मागणी सर्व प्रभागात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी. जंतुनाशक व डास प्रतिबंधक फवारणी मोठ्या प्रमाणात केली जावी. विशेष आरोग्य ड्राईव्ह राबवून ताप असलेल्या नागरिकांची तपासणी करून त्वरित औषधोपचार करण्यात यावेत.सध्या जवळपास प्रत्येक कुटुंबात एखादा तरी सदस्य तापाने त्रस्त असल्याचे चित्र आहे. खासगी रुग्णालयांत मोठ्या प्रमाणावर गर्दी असून खर्च परवडणारा नाही. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांवर उपचाराचा प्रचंड आर्थिक भार पडत आहे. काही प्रकरणांत गंभीर रुग्णांना नागपूर, अमरावतीकडे हलवावे लागत आहे.



# बुद्धिबळात कु. देवांशी गावंडे हिने वाढविली आपल्या जिल्ह्यासह विदर्भाची शान

■सातारा येथे क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा व चेस असोसिएशन सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे नुकत्याच दि.१२.११.२०२५ ते १४.११.२०२५ दरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ १९ वर्ष वयोगटात संपूर्ण राज्यातून आठ क्रीडा विभागातून निवडून आलेल्या प्रत्येक विभागातून पाच मुले व मुली अश्या चाळीस चाळीस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये अकोला जिल्ह्याच्या कु. देवांशी गावंडे हिची संपूर्ण विदर्भातून अंडर १९ गर्ल्स या गटात चमकदार कामगिरीचे बळावर तिची राष्ट्रीय स्तरावर निवड झालेली आहे ही बाब अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची आहे.

स्पर्धेदरम्यान एकूण सहा फेऱ्या घेण्यात आल्या पहिल्या फेरीपासूनच देवांशी तिने दमदार सुरुवात करीत आपल्यापेक्षा जास्त मानांकित स्पर्धकांना पराजित करीत शेवटच्या सहाव्या फेरीत प्रथम क्रमांकाच्या टेबलवर खेळून आपल्या एकाग्रता समयसूचकता .निर्णयक्षमता आणि प्रबळ आत्म विश्वास च्या बळावर शेवटचा सामना अनिर्णित राखून तिने राष्ट्रीय संघात आपले स्थान पक्के केले ती एल आर टी कॉलेज ची वर्ग बारावीची विद्यार्थिनी असून तिला कॉलेजमधून प्राचार्य सर तसेच डॉक्टर कविता बोके मॅडम आणि विशेष करून प्राध्यापक अजय पाडलीवाल क्रीडा प्रशिक्षक यांचे विशेष पाठबळ मिळाले आणि प्रोत्साहन मिळाले ती आपल्या यशाचे श्रेय आपले सुरुवातीपासूनचे बुद्धिबळ प्रशिक्षक आणि पाठीशी उभे राहणारे शुभचिंतक सर्व हितचिंतकांना समर्पित करीत आहे




# अन्न धान्याची थेट विक्री करणाऱ्यांवर करडी नजर

**अकोला:** महाराष्ट्र शासनाने राज्यातील अन्न धान्याची थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर प्रभावी देखरेख व पर्यवेक्षण करण्यासाठी नवी समिती गठित केली असून याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. ग्राहकांची सुरक्षा यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उपसचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना करण्यात आली असून अन्य राज्यातील थेट विक्रीचा अभ्यास ही समिती करणार आहे. सद्यस्थितीत राज्यात थेट विक्री संदर्भातील कोणत्याही मार्गदर्शक सुचना अथवा अधिसूचना अस्तित्वात नसल्याने या क्षेत्रात स्पष्ट नियमावली तयार करण्याची आवश्यकता होती.

# परळी अकोला पॅसेंजरसह विविध गाड्यांमध्ये आकस्मिक तिकीट तपासणी

**अकोला :** दक्षिण-मध्य रेल्वे विभागाच्या वतीने मंगळवारी परळी अकोला-पॅसेंजरसह विविध धावत्या रेल्वे गाड्यांमध्ये तिकीट तपासणी मोहिम राबविण्यात आली. रेल्वे गाड्यांमध्ये तिकीट तपासणी करून तिकीट नसलेल्या प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेमुळे प्रवाशांमध्ये नैतिक भीती निर्माण झाली. संगणापूर हॉल्टवर अचानक बस रेड आणि ॲम्बुश तिकीट तपासणी करून विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करण्यात आली. तपासणी पथक बसने संगणापूर हॉल्टवर पोहोचले आणि तपासणी केली. ऑपरेटिंग ब्रँचच्या समन्वयाने, परभणी, गंगाखेड आणि मानवथ रोड सारख्या लगतच्या स्थानकांवर गाड्यांना अतिरिक्त थांबे, नियंत्रित थांबे देऊन अचानक तपासणी करण्यात आली. मोहिमेदरम्यान खालील गाड्यांची तपासणी करण्यात आली: राज्य राणी एक्सप्रेस, बंगळुरू एक्सप्रेस, हैदराबाद-पूर्णा एक्सप्रेस, गुंटूर एक्सप्रेस, रायचूर एक्सप्रेस, परळी-अकोला पॅसेंजर, मनमाड-नांदेड पॅसेंजर, संपर्क क्रांती एक्सप्रेस, नगरसोल - काचीगुडा, पुणे एक्सप्रेस आणि हडपसर विशेष ट्रेन मध्ये तिकीट तपासणी करण्यात आल दरम्यान तिकीट ऑन ट्रान्सफरच्या ४ प्रकरणांमधून ९ हजार १०० रूपये वसूल करण्यात आले. सार्वजनिक भाषण प्रणालीद्वारे जागरूकता घोषणा देखील करण्यात आल्या. या तपासणीमुळे अचानक तिकीटविरहित प्रवासाला आळा घालण्यात आणि प्रवाशांमध्ये शिस्त वाढविण्यात महत्त्वपूर्ण योगदान मिळाले आहे. या मोहिमेमुळे तिकीट नसलेले प्रवासी, आरक्षित डब्यातून प्रवास करणारे सीझन तिकीटधारक आणि अनधिकृत फेरीवाले, विशेषतः परभणी-पूर्णा, परभणी-नांदेड, परभणी- परतूर आणि पूर्णा-अकोला विभागांमध्ये नैतिक भीती निर्माण झाली आहे.

## थोडक्यात

### आरडीजी महाविद्यालयात प्रेरणादायी व्याख्यान



**अकोला :** आरडीजी महिला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी समितीद्वारे एक दिवसीय प्रेरणादायी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. अश्विनी आळशी उपस्थित होत्या. भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका उपाध्यक्ष रवी गोयनका, भरत गोयनका, सचिव आलोक गोयनका आणि प्राचार्य डॉ. चारुशीला रूमाले डॉ. अंबादास पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. चारुशीला अज्ञल रुमाले, समितीचे समन्वयक प्रा. अजय शिंगाडे, डॉ. शालिनी बंग, डॉ. रूपा गुप्ता , डॉ. विनोद खैरे, डॉ. हर्षदा वाधोणे, प्रा. ज्योती चांडक यांची उपस्थिती होती.वक्त्या प्रा. अश्विनी आळशी यांनी आरडीजी महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शिक्षणाच्या काळामध्ये मान खाली करून शिक्षण घेतल्यानेच मान ताठ होते. स्वतःवर, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वावर प्रेम करावे , आपली प्रगती करावी, शिक्षणाने प्रगती साध्य होत असल्याचे सांगितले. संचालन डॉ. रुपा गुप्ता, आभार प्रदर्शन डॉ. शालिनी बंग यांनी केले.

### आदिवासींना ब्लॅकेट्स व साड्यांचे वितरण

**अकोला :** आसोफिकल ऑर्डर ऑफ सर्विस चित्रक ग्रुपच्या वतीने मेळघाटातील आदिवासी बंधूंना ब्लॅकेट्स व साड्या वाटपाचा उपक्रम नुकताच संपन्न झाला. स्थानिक व्यावसायिक शिवप्रकाश सावल, ओमप्रकाश सावल, यश सावल आणि देवेश मुंदडा परिवारा तर्फे चित्रक ग्रुपला ५१ वुलन ब्लॅकेट्स या उपक्रमासाठी प्राप्त झाले तसेच थी आसोफिकल सोसायटीचे सदस्य दिनेश चंदन यांनी २१ नवीन साड्या भेट दिल्या. सोसायटीचे सदस्य विनोद देव, रवींद्र बुलनकर, दिनेश चंदन, राजू उखळकर व थिवासॉफिकल ऑर्डर ऑफ सर्विस चे महाराष्ट्राचे प्रमुख डॉ श्रीकांत उखळकर यांनी मेळघाटातील घटांग गावाजवळील लवादा या छोट्या आदिवासी वस्तीमध्ये जाऊन तेथील ५० कुटुंबांना ब्लॅकेट्स व नवीन साड्यांचे वाटप केले. यापूर्वी गत महिन्यात ऑर्डर ऑफ सर्विस महाराष्ट्र तर्फे मराठवाड्यातील वसमत तालुक्यातील कुरुंदा या खेड्यात २०० कुटुंबांना दिवाळीचा शिधावाटप करण्यात आले होते.

### शिवर येथे श्रीमद संगीत भागवत सप्ताह

**अकोला :** जिल्ह्यातील शिवर येथील जागृत श्री दुगादेवी मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा चौतीसावा तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठे विसाव्या वर्धापन दिन उत्सव निमित्त श्री दुगार्देवी संस्थान शिवर यांच्या विद्यमाने ६ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री दुगार्देवी संस्थान शरद नगर शिवर येथे अमरावती येथील प्रख्यात भागवताचार्य हभप कैलासचंद्र महाजन चांदरकर यांच्या मधुर वाणीतून श्रीमदब संगीत भागवत कथा प्रवचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त ६ डिसेंबरला मौसपुर येथील हभप केशव महाराज मोरे, ७ डिसेंबरला यवतमाळ येथील हभप रमेश महाराज दुधे, ८ डिसेंबरला आळंदी देवाची येथील हभप अमोल महाराज दुधे, ९ डिसेंबरला पारस येथील हभप अरुण महाराज लांडे, १० डिसेंबरला खरप खु येथील हभप गजानन महाजन गोंडचवर, ११ डिसेंबरला सखारामपुर येथील हभप निलेश महाराज झामरे, १२ डिसेंबरला उरळ येथील हभप गोपाळ महाराज उरळकर या नामवंत हरीकीर्तनकार महाराजांची हरीकीर्तने रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत पार पडणार आहेत. किर्तन सकाळी १० ते १२ या वेळेत होणार आहे. याप्रसंगी १३ डिसेंबरला माऊली हरिपाठ मंडळ शिवर यांच्या नेतृत्वाखाली श्रीमदब भागवत ग्रंथाची नगरप्रदक्षिणा सकाळी ६ ते १० या वेळेत काढण्यात येणार आहे.

# सीसीआयच्या कापूस खरेदीची मर्यादा वाढवा

**अकोला :** सीसीआयकडून खरेदी करण्यात येत असलेल्या कापूस खरेदीची मर्यादा वाढविण्यासाठीभाजपा पदाधिकारी प्रयत्न करीत आहेत५.६० क्विंटल वाढवून मागील वर्षा इतकी कीमान १२ क्विंटल प्रति एकर इतकी वाढविण्यात यावी, अशी मागणी आमदार रणधीर सावरकर यांनी केली आहे. सीसीआय मार्फत खरेदी करण्यात येत असलेल्या कापसाची उत्पादन मयार्दा १२ क्विंटल प्रति एकरी (३० क्विंटल प्रति हेक्टरी) इतकी वाढवून देण्याकरिता आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. तसेच सीसीआय महाप्रबंधाकडे खरेदी उत्पादन मयार्दा वाढवून देण्याकरिता चर्चा केलेली आहे. महाराष्ट्र कृषी विभागाने चालु हंगाम सन २५-२६ मध्ये कापसाची उत्पादकता ही प्रती एकरी ५. ६० क्विंटल ग्राह्य धरून पणन मंत्रालयामार्फत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाला पाठवली आहे. त्यानुसार सीसीआयने चालू हंगामातील प्रती हेक्टरी १३.५७ क्विंटल ग्राह्य धरून कापूस खरेदीची मयार्दा जाहीर केली. परंतु, अकोला जिल्हा मुख्यत्वे कापूस उत्पादक असल्याने प्रत्यक्षात जिल्ह्यातील शेतकरी हा प्रती हेक्टरी सरासरी २५ ते ४० क्विंटल कापसाचे उत्पन्न घेतात.

# डी.ए.वी कॉन्व्हेन्टच्या विद्यार्थ्यांनी गिरविले बाल हक्काचे धडे



■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
बालकांचे हक्क व त्यांना कायद्याचे न्यान मिळावे या उद्देशाने १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बालक दिनाच्या दिवशी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष,एसेस टू जस्टिस प्रकल्प अकोला, एन्कारेज एज्युकेशनल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डी.ए.व्हि कॉन्व्हेन्ट अकोला येथे बालकांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती रोशनी बन्सल मॅडम सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला, श्री गिरीश पुसदकर जिल्हा महीला व बाल विकास अधिकारी, श्रीमती प्रांजली जैसवाल सदस्य बालकल्याण समिती, श्री राजेश देशमुख,श्री राजू लाडुलकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, ॲड मनिषा भोरे केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर,श्री शंकर वाघमारे जिल्हा समन्वयक बाल विवाह मुक्त भारत अभियान, श्री महेंद्र गणोदे अध्यक्ष एन्कारेज एज्युकेशनल फाउंडेशन, श्री सुनील लाडूलकर संरक्षण अधिकारी लाभले होते विद्यार्थ्यांना सुरक्षित स्पर्श असुरक्षित स्पर्श, बालकांचे अधिकार हक्क, १०९८ चाईल्ड हेल्प लाईन या बाबत हितगूज साधले आणि मार्गदर्शन केले एसेस टू जस्टिस प्रकल्प च्या सपना गजभिये यांनी बालविवाह न करण्याबाबत शपथ कार्यक्रम घेतला कार्यक्रमाचे सूत्र संचालन महेंद्र गणोदे यांनी केले तर प्रमुख अतिथी चे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक श्री.डोंगरे सर यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एसेस टू जस्टिस प्रकल्प चे कर्मचारी व शाळा प्रशासन यांनी प्रयत्न केले

# महामार्गांवर क्यूआर कोड होर्डिंग्ज लावणार

अकोला: केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावरील अधिसूचना जारी केली आहे. महामार्गांवर क्यूआर कोड असलेले विशेष होर्डिंग्ज बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच सर्व प्रमुख महामार्गांवर हे डिजिटल होर्डिंग्ज बसवण्यात येतील. हे क्यूआर कोड स्कॅन केल्याने प्रवाशांना महामार्गाचा नंबर, किलोमीटर अंतर, गस्त पथक, टोल व्यवस्थापक आणि निवासी अभियंता यांची संपर्क माहिती त्वरित उपलब्ध होईल.

याव्यतिरिक्त, आपत्कालीन परिस्थितीत १०३३ या अत्यावश्यक हेल्पलाइन क्रमांकाची माहिती तात्काळ दिसून येईल. जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग जातात, त्यामुळे या उपक्रमाचा स्थानिक नागरिकांनाही फायदा होईल. या तंत्रज्ञानामुळे एक नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे.. प्रवाशांना कोड सहज दिसावेत यासाठी, ते टोल प्लाझा, विश्रांती थांबे, ट्रक ले-बाय क्षेत्रे तसेच महामार्गाच्या सुरुवातीच्या आणि शेवटच्या ठिकाणी स्थापित केले जातील. या डिजिटल उपक्रमामुळे प्रवाशांना त्यांच्या प्रवासादरम्यान तात्काळ मदत आणि आवश्यक माहिती मिळेल. तसेच संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांबद्दल माहिती देखील मिळेल.

# मोकाट श्वानांनी तोडले अनेकांचे लचके; अनेक नागरिकांना गंभीर दुखापत

■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :
महापालिकेच्या पश्चिम झोन अंतर्गत येणाऱ्या जुने शहरात मोकाट श्वानांनी अनेक नागरिकांना चावा घेतल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये महापालिका प्रशासनाविषयी संतापाची भावना व्यक्त होत आहे. याला महापालिका प्रशासनाच्या कोंडवाडा विभागाचा भोंगळ कारभार कारणीभूत होत असल्याचा आरोप होत आहे.गेल्या अनेक दिवसांपासून महापालिकेच्या कोंडवाडा विभागाचा अनागोंदी कारभार सुरू असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळेच अकोला शहरातील प्रमुख मार्गावर तसेच गल्लीबोळ्या मोकाट श्वानांनी हैदोस सुरू असून, भर रस्त्यांवर त्यांनी उच्छाद मांडला आहे तसेच मोकाट जनावरांचादेखील भर रस्त्यावर मुक्त संचार असल्याने अपघातांच्या घटना घडत आहेत. याकडे अनेक नागरिकांनी तसेच माजी नगरसेवकांनी महापालिका प्रशासनाला अवगत केल्यानंतर त्यांच्या सूचनेकडे साफ दुर्लक्ष केल्याने संतापाची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, मोकाट श्वानांनी जुने शहरातील चिमुकल्याच्या हातासह अनेक नागरिकांना नागरिकांचे लचके तोडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनाला अवगत केल्यानंतरही कोंडवाडा विभागाकडून कोणत्याही उपाययोजना व श्वान पकडण्याची कारवाई झाली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे ही बाब महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी गांभीर्याने घेण्याची मागणी जोर धरत आहे.अन्यथा कोंडवाडा विभागाच्या विरोधात जन आंदोलन छेडण्याचा इशारा काही माजी नगरसेवकांनी दिला आहे.



# अकोट बाजार समितीत शेतकरी मदत कक्ष सुरु

**अकोट :** कपास किसान ॲप वर ३१ डिसेंबर पूर्वी शेतकऱ्यांनी नोंद करणे आवश्यक आहे. नोंद करतांना तांत्रिक अडचणीं आल्यास अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आज शनिवार दि. १५ पासून शेतकरी मदत कक्ष सुरू केले आहे. अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे यांनी ही माहिती दिली आहे. ३१ डिसेंबर पूर्वी शेतकऱ्यांनी मोबाईल प्ले स्टोअर वरून सदर ॲप्स वर नोंद करणे आवश्यक आहे. अकोट येथील केंद्रावर सोमवार दि. १७ पासून सीसीआय तर्फे कापूस खरेदीला सुरवात होणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांना कपास किसान ॲप्स वर नोंद करतांना तांत्रिक अडचणी येत असतील अशांनी बाजार समितीच्या शेतकरी मदत कक्षाला भेट देण्याचे आवाहन सभापती प्रशांत पाचडे यांनी केले आहे. सदर मदत कक्ष शासकीय सुट्टी वगळता दररोज सकाळी ११ ते ५ या वेळात सुरू असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# बिहारचा 'रेवडी' जनादेश

बिहारची निवडणूक पार पडली आणि एकदाचा तो विषय संपला. विरोधी पक्षांची झालेली दाणादाण पाहून विविध प्रकारच्या चर्चांना उधाण आले. नितीश कुमार यांच्या पक्षाने मारलेली छलांग हा कुतूहलाचा विषय ठरला. बिहार एक असं राज्य, ज्याने गेल्या काही दिवसांपासून राजकीय पक्षांची धडधड वाढवली होती. बिहार विधानसभा निवडणुकीत यंदा मतदारांनी रेकॉर्डब्रेक मतदान केलं. गेल्या निवडणुकांच्या तुलनेत मतदानाची टक्केवारी नऊ टक्के जास्त होती. त्यानंतर एनडीएच्या बाजूने निकाल लागला. बिहारमध्ये पुन्हा एकदा नितीश कुमार यांचं राज्य असेल. एनडीएला जरी या निवडणुकीत बहुमत मिळालं असलं तरी निवडणूक कोण जिंकेल याची पर्वा न करता नितीश कुमार नेहमीच त्यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा करतात. म्हणूनच बिहारमध्ये नितीश कुमार यांनी सर्वाधिक काळ राज्य केलं आहे. बिहारच्या इतिहासात सर्वांत जास्त काळ मुख्यमंत्री असूनही नितीश कुमार यांनी विधानसभा निवडणूक का लढवली नाही, हा प्रश्न अनेकांना पडला आहे. बिहारमध्ये अत्यंत स्वच्छ प्रतिमा असलेले नितीश कुमार राजकारणात पारंगत आहेत. बिहारच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कामाचं जनतेनं कौतुक केलं आहे. याच विकासकामांमुळे त्यांना 'विकास पुरुष' ही पदवी मिळाली आहे. बिहारमधील महिलांसाठी त्यांनी अनेक पाऊलं उचलली आहेत. नितीश कुमार यांचा सर्वांत मोठा मास्टरस्ट्रोक हा महिलांसाठी आरक्षण होता. आज बिहार हे देशातील पहिलं राज्य आहे, ज्याने स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायतींमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिलं आहे. २००५ पूर्वी बिहारमधील पंचायती राज संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण नव्हतं. त्यानंतर राज्यातील सरकारी नोकऱ्यांमध्येही महिलांसाठी ३५ टक्के आरक्षण कोटा लागू केला. बिहारच्या निवडणुकीत एनडीएला २०२ जागांवर विजय मिळाला, तर विरोधकांच्या महाआघाडीला अवघ्या ३४ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपला ८९ जागा, जेडीयूला ८५ जागा, एलजेपीला १९ जागा तर महाआघाडीतील राजदला २५ तर काँग्रेसला अवघ्या पाच जागा मिळाल्या. बिहारच्या राजकारणात जातीय समीकरणांना सर्वाधिक महत्व राहिलेलं आहे. 'सोशल इंजिनिअरिंग' बिहारच्या निवडणुकीत परवलीचा शब्द बनून जातो. या निवडणुकीत नितीशकुमार आणि भाजप जातीय समीकरणं आपल्या बाजूनं ठेवण्यात यशस्वी ठरल्याचं दिसत आहे. गेल्या अनेक निवडणुकांपासून इतर मागासवर्गीय मतदार प्रामुख्यानं नितीशकुमारांच्या पाठीशी राहिला आहे. खरं तर, त्यांचा पाठिंबा हे नितीशकुमारांच्या निवडणुकीतील यशाचं एक महत्वाचं कारण मानलं जातं. म्हणूनच या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस यांच्या महाआघाडीनं 'त्या' मतदारांना आपल्या बाजूनं खेचण्याचा जोरदार प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाहीच. महिलांच्या खात्यात दहा हजार रुपये जमा होताच, तो संपूर्ण मतदार वर्ग एनडीएच्या बाजूनं झुकला. महाराष्ट्रात अवघे दीड हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यावर जमा केले होते, तोच प्रयोग बिहारमध्ये यशस्वी केला. तत्पूर्वी मध्य प्रदेश मध्ये हाच पॅटर्न लागू केला होता. यापूर्वी असे काही केल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी त्याला 'रेवडी' वाटप म्हणायचे. परंतु शेवटी याच 'रेवडी'चा त्यांना आधार घ्यावा लागला व मोठा विजय त्यामुळेच प्राप्त झाला!



बिहारचे राजकारण जातीपाती भोवती कायम फिरत राहते. 'एमवाय' हा पॅटर्न प्रत्येक वेळी चर्चेला येतो. इतर मागासवर्गीय जाती एनडीएसोबतच राहण्यामागं त्यांचा यादव समाजाच्या वर्चस्वाला असलेला विरोध हे महत्वाचं कारण मानलं जातं. जर आपण आरजेडीला सत्ता दिली, तर यादव समाजाचे वर्चस्व प्रस्थापित होईल अशी भीती त्यांच्यामध्ये असल्याचं मानलं जातं. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे आरजेडीने जरी इतर मागासवर्गीयांना सोबत आणण्यासाठी प्रयत्न केले असले, तरी त्याचे प्रतिबिंब तिकीट वाटपात दिसले नाही. तिकीट वाटपात आरजेडीकडून यादव उमेदवारच मोठ्या प्रमाणात देण्यात आले. यामुळे या निवडणुकीत आरजेडीची भिस्त प्रामुख्यानं 'मुस्लीम-यादव' (एमवाय) समीकरणापुरतीच मर्यादीत राहिलेली दिसते. त्यातीलही काही मतदान एनडीए किंवा एमआयएमकडे गेलेले दिसले. या निकालामुळे एनडीएने जातींचे मायक्रो मॅनेजमेंट केल्याचे दिसून आले. महिला मतदारांची भूमिका या निवडणुकीतही महत्वाची ठरली. तो मतदार हा नितीशकुमारांचा पाठीराखा मानला जातो. या निवडणुकीत महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर महिलांना लघुउद्योग किंवा व्यवसायासाठी दहा हजार रूपये देण्याची योजना नितीशकुमारांनी आणली आणि ती गेमचेंजर ठरली. त्याचा एनडीएला या निवडणुकीत फायदा झाला. महिला मतदारांची एक स्वतंत्र कॉन्स्टिट्यूयन्सी निर्माण करण्यात नितीशकुमार यशस्वी ठरले. नितीशकुमारांनी बिहार राज्यात केलेली दारूबंदी, मुलींसाठी सायकली देण्याची योजना, महिलांसाठी विविध योजना यांचा प्रभाव महिला मतदारांवर पडला. कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी चांगला प्रयत्न केला. एनडीएनं जवळपास ३१ हजार कोटी रुपये वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून वाटले. महिलांना देण्यात आलेल्या पैशांचा एक हप्ता, तर निवडणुकीच्या काळातच दिला. त्याखेरिज, त्यांनी आणलेल्या वेगवेगळ्या योजना पाहता, अँटी-इन्कम्बन्सीची लाट तशी दिसतच नव्हती. कुणीही फार असंतोष व्यक्त करताना दिसत नव्हतं. जो काही असंतोष होता, तो थोपवण्यात त्यांना यश आले. एकीकडे एनडीए अधिक मजबूत दिसत असताना आरजेडी, काँग्रेस, डावे, यांच्या महाआघाडीतील धुसफूस, बेबनाव अगदी उघडपणे दिसत होता. जागावाटपावरून आरजेडी आणि काँग्रेसमधील मतभेद अगदी तुटेपर्यंत ताणले गेले होते. काँग्रेसच्या काही नेत्यांना पाठवून दोन्ही पक्षांच्या जागावाटपात समेट घडवून आणावा लागला. तरीही काही जागांवर सहमती न झाल्यानं आघाडीतील पक्षांनीच एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केल्याचं दिसलं. या आघाडीत प्रामुख्यानं भिस्त आरजेडीवर होती आणि इतर पक्षांची राज्यव्यापी लक्षणीय ताकद नसल्यानं ही आघाडी एनडीएसमोर कमकुवत ठरल्याचं दिसलं. प्रचारात जर पाहिले तर तेजस्वी यादव यांनी झंझावाती प्रचार केला, पण तुलनेनं काँग्रेसकडून राहुल गांधी यांचा प्रचार झंझावाती दिसला नाही. 'व्होट अधिकार यात्रे'तून राहुल गांधींनी चैतन्य निर्माण केले होते. पण त्यानंतर त्यांचा प्रचार जोरकसपणे दिसला नाही. महाआघाडीच्या तुलनेत एनडीएनं खूप आधीपासूनच तयारी सुरू केलेली होती. त्यामुळे, त्यांची सरशी झाली. राजद आणि काँग्रेसची युती नंतर झाली. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यासोबत डाव्या पक्षांसह आणखी काही छोटे पक्ष होते. बारा जागांवर मैत्रिपूर्ण लढतींमुळे एक वेगळा संकेत गेला. दुसरी गोष्ट म्हणजे मित्रपक्षांनी ज्याप्रकारे कामगिरी बजावायला पाहिजे होती, तिचा स्पष्ट अभाव दिसून आला. शिवाय 'जंगलराज' हा शब्द मतदारांपर्यंत पोहोचविण्यात एनडीएला यश आले. त्याचा फटका महाआघाडीला बसला. गेल्या तीन चार महिन्यापासून मत चोरी हा विषयावर रान उठवून तसेच बिहारच्या स्थानिक प्रश्नाबाबत महा गटबंधन म्हणून राहुल गांधी असतील, तेजस्वी यादव असतील यांनी प्रचार यंत्रणा राबवली. त्यात त्यांना अपयश आले. त्याबाबत त्यांनी विचार मंथन जरूर केले पाहिजे. काही चुका असतील, तर त्या सुधारल्या पाहिजेत. मात्र एक गोष्ट आवर्जून चर्चिली जात आहे, महाराष्ट्रात लाडक्या बहिणींचा विषय असेल, मध्य प्रदेशमध्ये असेल किंवा आता बिहारमध्ये महिलांच्यासाठीचे आर्थिक धोरण असेल व जातीय ध्रुवीकरण असेल किंवा निवडणुकीच्या अनुषंगाने सोशल इंजिनिअरिंग असेल याबाबत विचार करण्यासारखी परिस्थिती आहे. महाराष्ट्रामध्ये लाडक्या बहिणींच्या निधीमुळे विकास कामावर काय परिणाम झाला आहे, हे आपण महाराष्ट्रातील नागरिक बघत आहोतच. सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्ष असेल, कोणताही पक्ष प्रलोभन देण्यासाठी मागे राहत नाही. मग दिल्लीमध्ये मोफत वीज असेल, कर्नाटकात काँग्रेसने दिलेली आश्वासन असतील, महाराष्ट्रातील विषय आहे, मध्य प्रदेश आहे, आता बिहार आहे, सत्ता हस्तगत करण्यासाठी सरकारचा निधी वापरून सत्ता हस्तगत करणे हे आता समीकरण शंभर टक्के रूढ झाले आहे. अशाच पद्धतीने नागरिकांना, मतदारांना अपेक्षित असेल तर काय बोलणार? कधीकाळी राजकीय पक्षांना सुबुद्धी सुचेल, मग त्यात सर्वच राजकीय पक्ष आले, त्यावेळी काय तो यात बदल होईल, असे गृहीत धरायचे. नाहीतर अशाच पद्धतीने 'रेवडी'चे राजकारण महाराष्ट्रात व देशभरात राहणार आहे.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

## स्वतःची निवडणूक व नितीश कुमार

नितीश कुमार यांनी १९८५ मध्ये शेवटची विधानसभा निवडणूक लढवली होती. पण याचा अर्थ असा नाही की त्यांनी कधीही निवडणूक लढवली नाही. त्यांनी १९७७, १९८० आणि १९८५ मध्ये सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये भाग घेतला होता. परंतु नशिबाने त्यांना फक्त १९८५ च्या निवडणुकीत साथ दिली. १९७७ आणि १९८० च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर त्यांनी स्थानिक राजकारणापासून स्वतःला दूर केलं आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारणावर लक्ष केंद्रीत केलं. नितीश कुमार यांनी फक्त एकच विधानसभा निवडणूक जिंकली असली तरी त्यांनी लोकसभा निवडणुकीत अपवादात्मक कामगिरी केली. १९८९, १९९१, १९९६, १९९८ आणि २००४ मध्ये त्यांनी सलग सहा लोकसभा निवडणुका जिंकल्या. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी बाढ आणि नालंदा या दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. परंतु फक्त नालंदा मतदारसंघातून त्यांना विजय मिळाला. ही त्यांची शेवटची वैयक्तिक निवडणूक होती. त्यानंतर त्यांनी कधीही निवडणूक लढवली नाही. पण बिहारचे नेतृत्व मात्र सदैव त्यांच्याच ताब्यात राहिले.

## नितीशबाबू व पाठिंबा

नितीश कुमार यांनी नोव्हेंबर २००५ मध्ये दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. नऊ महिन्यांचा काळ सोडला तर ते आजपर्यंत बिहारवर राज्य करत आहेत. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने मोठा विजय मिळवला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रातील सत्ता हाती घेतली. परंतु राजकीय मतभेदांमुळे नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर जितन राम मांझी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मांझी आणि भाजपमधील जवळीक पाहून नितीश कुमार यांनी २०२५ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी कमबॅक केला आणि मुख्यमंत्रीपद स्वीकारलं. त्यानंतर त्यांनी आरजेडीसोबत युती केली आणि मजबूत जनादेश मिळवला. परंतु २०१७ मध्ये ते एनडीएमध्ये परतले. बिहारमध्ये जनादेश कोणालाही मिळाला तरी नितीश कुमार यांनी कधीच मुख्यमंत्रीपद सोडलं नाही. त्यांना वाटलं तेव्हा ते महाआघाडीत सामील झाले आणि जेव्हा कटुता निर्माण झाली तेव्हा त्यांनी एनडीएमध्ये कमबॅक केलं. त्यामुळे विरोधकांनी त्यांची 'पलटूराम' या नावाने अनेकदा खिल्ली उडविली.

## दारूबंदीचा निर्णय महिलांना आवडला

नितीश कुमार यांनी दारूबंदीचा निर्णय घेतला. त्यांनी केवळ दारूबंदी केली नाही तर महिलांच्या संरक्षणासाठी कठोर कायदेही केले. महिलांनी त्यांच्या या निर्णयाचं स्वागत खुल्या मनाने केलं. यासोबतच मुलींसाठी पोशाख आणि सायकल योजना लागू केल्यानंतर बिहारमध्ये मुलींसाठी शिक्षणाचे नवे दरवाजे उघडले. एका अनुभवी राजकारण्याप्रमाणे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी राजकीय डावपेच आखले होते. सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेची रक्कम वाढवणं, १२५ युनिटपर्यंत मोफत वीज देणं आणि मोठ्या संख्येने तरुणांना नोकऱ्या आणि रोजगार देण्याचं आश्वासन देणं यासह अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. तसंच महिलांच्या खात्यात रक्कम हस्तांतरित करणं हा सर्वांत मोठा मास्टरस्ट्रोक असल्याचं म्हटलं जात आहे. म्हणूनच गेल्या निवडणुकीप्रमाणे यावेळीही महिलांनी मोठ्या संख्येनं एनडीएच्या पारड्यात मतदान टाकले. त्याचाच परिणाम म्हणून महिलांचे मतदान एनडीएच्या पारड्यात पडले व नितीशबाबूंनी एक मोठा विजय संपादन करून इतिहास घडविला.

---



# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई – पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत.

निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

# विद्यार्थी : नवयुगाच्या परिवर्तनाचे वाहक

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ एका दिवसाचे स्मरण नाही; तो समाजाच्या उत्क्रांतीतील विद्यार्थी या शक्तिशाली घटकाची ओळख करून देणारा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक प्रक्रियेचा जीवंत पुरावा आहे. १७ नोव्हेंबर हा दिवस जगभरात अशा विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ पाळला जातो, ज्यांनी शिक्षण, स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि ज्ञानस्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. विद्यार्थी हे समाजाचे प्रतिबिंब मानले जातात; समाजातील मूल्ये, संघर्ष, धारणा, आकांक्षा आणि भविष्यदृष्टी विद्यार्थीवर्गात प्रकर्षाने दिसून येतात. म्हणूनच या दिवसाचे महत्त्व केवळ शैक्षणिक घटकापुरते मर्यादित नसून, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ते मानवी सभ्यतेच्या विकासाचा मूलभूत आधार आहे.

जगातील विविध संस्कृती, जात-धर्म, भाषा, आर्थिक स्तर आणि राजकीय परिस्थिती यामुळेएकबहुविध विद्यार्थीसमूह निर्माण होतो. हा विद्यार्थीवर्गही केवळशाळा-कॉलेजांतून शिक्षण घेणारी मंडळी नसून, समाजरचनेतील शिक्षित नागरिक होण्याची प्रक्रिया अंगीकारणारी व्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने विद्यार्थी म्हणजे समाजातील सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा होय. विद्यार्थीदशा ही मानवी जीवनातील सर्वात निर्मितीक्षम अवस्था आहे. मूल्यांची रुजवण, विचारांची परिपक्वता, सामाजिक न्यायाची भावना, समावेशकतेचा विकास आणि नागरी जबाबदारीची जाणीव यांची सुरुवात याच काळात दृढ केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा आधुनिकसमाजाच्याचौकटीतविद्यार्थ्यांना असणाऱ्याकर्तव्य आणि जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे.

या दिवसाचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १९३९ मध्ये नाझीवादाच्या विरोधात उभे राहिलेले चेकोस्लोव्हाकियातील विद्यार्थी हे स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांसाठी लढणाऱ्या युवा पिढीचे प्रतीक बनले. त्यांच्या बलिदानाने जगभरात विद्यार्थ्यांचे अस्मितासंघर्ष, सामाजिक न्यायाच्या लढाया आणि बौद्धिक क्रांतीची सुरुवात केली. समाजशास्त्रानुसार विद्यार्थी आंदोलन ही सामाजिक बदलांची ऊर्जा असते. समाजातील अन्याय, दडपशाही, आर्थिक विषमता किंवा राजकीय अस्थैर्य यावर सर्वप्रथम प्रतिक्रिया विद्यार्थ्यांकडून येते. कारण विद्यार्थ्यांकडे विचारांची निर्भयता, प्रश्न विचारण्याची सवय आणि चुकीच्या व्यवस्थेविरोधात उभे राहण्याची मानसिकता असते. हीच वैशिष्ट्ये त्यांना सामाजिक प्रगतीचे वाहक बनवतात.



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

आजच्या काळातील विद्यार्थी हे जागतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेत वाढलेले ग्लोबल सिटिझन्स आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विस्फोटाने त्यांच्यापर्यंत ज्ञानाचे असंख्य मार्ग खुले केले आहेत. सामाजिक माध्यमे, डिजिटल साधने, ऑनलाईन शिक्षण, आंतरराष्ट्रीय एक्स्चेंज प्रोग्रॅम्स, विविध देशांच्या शैक्षणिक संधी या सर्वामुळे विद्यार्थीवर्ग एक जागतिक समुदाय बनला आहे. तथापि, या जागतिकीकरणात विषमता, भेदभाव, ओळख संघर्ष आणि मानसिक दडपण या समस्या देखील वाढल्या आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक शिक्षणव्यवस्थेत कौशल्याधारित स्पर्धा वाढली असली तरी मानवी मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा स्थितीत विद्यार्थ्यांना केवळ करिअर-केंद्रित नव्हे, तर मूल्य-आधारित आणि समाजोन्मुख दृष्टिकोन अंगीकारण्याचा संदेश देतो.

शिक्षणाचा खरा उद्देश मानवाला विचारक्षम बनवणे हा आहे. विद्यार्थी जेव्हा समाजातील प्रश्नांकडे चिकित्सक नजरेने पाहू लागतात, तेव्हा समाजातील बदल अपरिहार्य होत जातो. पर्यावरणीय समस्या, लैंगिक समानता, आर्थिक न्याय, भ्रष्टाचारविरोध, मानवाधिकार, ग्रामीण-शहरी विषमता यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थी सक्रियतेने आवाज उठवत असतात. उदा. जागतिक तापमानवाढीविरोधातील युवा आंदोलन, भारतातील विद्यार्थ्यांचे सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष, असमानतेविरोधातील लढाया ही सर्व विद्यार्थीचळवळी समाजाला नवी वाट दाखवतात. समाजशास्त्रात सामाजिक क्रिया ही संकल्पना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लागू पडते, कारण तेच सामाजिक कृतीचे प्रमुख घटक आणि सामाजिक क्रांतीचे जनक असतात.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आदर्शवाद होय. समाजात अनेकवेळा भ्रष्टाचार, अन्याय, सत्तेचा दुरुपयोग, संसाधनांचे असमान वाटप किंवा जातीय भेदभाव दिसून येतो. परंतु विद्यार्थी हा वर्ग या गोष्टींना सहज स्वीकारत नाही. त्यांच्या विचारांमध्ये नैतिकता आणि न्यायाची जाणीव प्रबळ असते. त्यामुळे विद्यार्थी हे समाजघटकांवर नैतिक दबाव निर्माण करण्याचे काम करतात. यामुळे सामाजिक मूल्यांचे संरक्षण आणि समाजाच्या नैतिक अधःपतनाविरोधात विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतात.

आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मानसिक आरोग्याचा प्रश्न सर्वात गंभीर आहे. सततची स्पर्धा, कुटुंबीय अपेक्षा, समाजातील तुलना, करिअरचा दबाव, आर्थिक ताण आणि डिजिटल विचलन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणा वाढताना दिसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक समाजातील उत्पादकता-केंद्रित संस्कृती विद्यार्थ्यांना यांत्रिक बनवत आहे. शिक्षणाचा आनंद, कल्पकता, संवाद, सांस्कृतिक सहभाग आणि भावनिक विकास यांना कमी महत्त्व दिले जात आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याची, संतुलित जीवनशैली राखण्याची आणि स्वतःबद्दल संवेदनशील राहण्याची आठवण करून देतो.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे सामाजिक माध्यमांचा प्रभाव होय. सोशल मीडिया विद्यार्थ्यांना माहितीचा प्रचंड स्रोत देतो, पण तेवढ्याच प्रमाणात त्यांच्यात तुलना, अपप्रचार, ध्रुवीकरण आणि भ्रम निर्माण करतो. समाजशास्त्रीय भाषेत या प्रक्रियेला प्रतिकात्मक हाताळणी किंवा माध्यम समाजीकरण असे मानले जाते. विद्यार्थी यामुळे अनेकदा खोट्या ओळखी, खोट्या अपेक्षा आणि अवास्तव यशाच्या स्पर्धेत अडकतात. म्हणूनच समाजाने विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे खरे तत्त्वज्ञान शिकवणे आवश्यक आहे.

याशिवाय ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांतील दरी आजही चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचा अभाव, आर्थिक मर्यादा, तंत्रज्ञानाची कमतरता आणि सामाजिक रूढी यांचा सामना करावा लागतो. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांना बहुआयामी संधी उपलब्ध नसतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही दरी सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा असमानतेकडे लक्ष वेधून शिक्षण सर्वसमावेशक, न्याय्य आणि लोकशाहीवादी करण्याचा संदेश देतो.

विद्यार्थ्यांचे समाजातील योगदान अपार आहे. ते केवळ भविष्यातील नागरिक नसून वर्तमानातील सक्रिय घटक आहेत. सामाजिक उपक्रम, स्वयंसेवा, डिजिटल अभियान, पर्यावरण संवर्धन, विज्ञान संशोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा आणि साहित्य या सर्व क्षेत्रांत विद्यार्थी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. समाजशास्त्रातील युवक भांडवल ही संकल्पना त्यांच्याशी अत्यंत निगडित आहे. ज्ञान, कौशल्य, ऊर्जा, सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि नवीन दृष्टी यामुळे विद्यार्थी समाजाच्या प्रत्येक घटकाचे पुनर्रचनाकार ठरतात.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन आपल्याला शिकवतो की प्रत्येक विद्यार्थ्यात एक बदल घडविण्याची क्षमता दडलेली आहे. शिक्षण हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नाही, तर समाजाला अधिक मानवी, समताधिष्ठित, शांतताप्रिय आणि न्याय्य बनविण्याचे साधन आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कौशल्य, नवनिर्मितीशीलता आणि संवेदनशीलता यांमुळे समाज अधिक सक्षम आणि प्रगतिशील होतो. म्हणूनच शिक्षक, पालक, शासन आणि समाजाने विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण, सुरक्षितता, संधी, समुपदेशन आणि मूल्याधारित शिक्षण देणे अत्यावश्यक आहे.

शेवटी, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ औपचारिक दिन नसून, तो विद्यार्थ्यांच्या संघर्ष, त्यांच्या स्वप्नांतील विस्तार, सामाजिक परिवर्तनातील त्यांचे योगदान आणि मानवतेसाठी त्यांच्या भूमिकेचे अभिवादन आहे. विद्यार्थी हे उद्याचे नाही तर आजचे शिल्पकार आहेत. त्यांच्या विचारांमध्ये एक समाज बदलण्याची क्षमता आहे, त्यांच्या स्वप्नांत एक जग घडविण्याची शक्ती आहे, आणि त्यांच्या कृतींत मानवतावादी भविष्यातील आशा दडलेली आहे. या दिवसाचे महत्त्व ओळखून आपण प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, समता, स्वातंत्र्य आणि संधी यांची हमी देणारे समाज निर्माण करण्याचा संकल्प केला, तरच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा करण्याचे खरे सार्थक होईल. विद्यार्थीवर्ग हा मानवतेचा दीपस्तंभ आहेत्यांची उजळणी झाली, तर समाजाचा उद्याही निश्चितच अधिक उज्ज्वल होईल.

# कौंडण्यपूर येथे कडकडत्या थंडीत तब्बल ५ किलोमीटरच्या मॅरेथॉन मध्ये शेकडो स्पर्धकांची कसरत

## अंबा रुख्मिणी महोत्सव २०२५ मध्ये भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

## थंडीच्या दिवसात युवकांचा उत्साह बघून तरुणाईला उजाळा मिळाला: रविराज देशमुख





**कौंडण्यपूर (प्रतिनिधी) :** कडकडत्या थंडीत तब्बल ५ किलोमीटरचे अंतर पार करून शेकडो स्पर्धकांनी कौंडण्यपूरच्या अंबा रुख्मिणी महोत्सव मध्ये एकच जल्लोष केला. महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४ मध्ये दिनांक ३० नोव्हेंबर रोजी भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तब्बल हजारो रुपयांचे बक्षिसे ठेवण्यात आली होती. ज्यामध्ये तब्बल नऊ स्पर्धकांनी यामध्ये बाजी मारली. विशेष म्हणजे यावेळी छोटे स्पर्धक सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. थंडीच्या दिवसात युवकांचा उत्साह बघून तरुणाईला उजाळा मिळाला असे प्रतिपादन यावेळी उदघाटक रविराज देशमुख यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला केले.

सर्वप्रथम पहाटे ६.०० वाजता सुरु झालेल्या या मॅरेथॉन स्पर्धेचे उदघाटन अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अध्यक्ष व भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनी केले. यावेळी विशेष अतिथी म्हणून डॉ. उमेश राठी (पी. ई. एफ. आय. विदर्भ चाप्टर), डॉ. अतुल पाटील (सचिव, अमरावती अथेलेटिक असोसिएशन अमरावती), डॉ. कल्याण मालधुरे (अध्यक्ष, बॉडी बिल्डिंग वेट लिफ्टिंग संगाबा), रविंद्रजी हाडे (तिवसा खरेदी विक्री संचालक), प्रेमदास राठोड (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर) यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेला तब्बल नऊ पारितोषिक ठेवण्यात आले. ज्यामध्ये प्रथम बक्षीस ९,९९९ रुपये (सरपंच, सर्व सदस्य व कर्मचारी गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर), द्वितीय बक्षीस ८,८८८ रुपये (अंबा रुख्मिणी महोत्सव समिती), तृतीय बक्षीस ७,७७७ रुपये (श्री अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती, श्री क्षेत्र कौंडण्यपूर), चतुर्थ बक्षीस ६,६६६ रुपये (कृणाल कडू, तालुका अध्यक्ष युवा स्वाभिमान पार्टी), पाचवे बक्षीस ५,५५५ रुपये (रविंद्रजी हांडे, संचालक तिवसा खरेदी विक्री संघ), सहावे बक्षीस ४,४४४ रुपये (अंबा रुख्मिणी महोत्सव समिती), सातवे बक्षीस ३,३३३ रुपये (वैभवभाऊ कदम व किशोरभाऊ अनेरकर), आठवे बक्षीस २,२२२ रुपये (गणेश वैरागडे), नववे बक्षीस १,१११ रुपये (प्रफुल देऊळकर) यांच्याकडून ठेवण्यात आले होते. संपूर्ण विदर्भातून आलेले विजेते स्पर्धक हजारो रुपयांच्या बक्षिसांचे मानकरी ठरले.

सर्वप्रथम कौंडण्यपूर येथील बस स्टॉप वरून सुरु झालेली हि मॅरेथॉन स्पर्धा मारडा गावापर्यंत ठेवण्यात आली होती, असे एकूण ५ किलोमीटरचे अंतर पार करून पहिल्या नऊ विजेत्या स्पर्धकांना हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात आली होती. बक्षीस वितरण समारंभाला डॉ. उमेश राठी (पी. ई. एफ. आय. विदर्भ चाप्टर), डॉ. अतुल पाटील (सचिव, अमरावती अथेलेटिक असोसिएशन अमरावती), डॉ. कल्याण मालधुरे (बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सचिव), प्रेमदास राठोड (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर), कोषाध्यक्ष गजानन बांबल, कृणाल कडू, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# सोनी सबवरील गणेश कार्तिकेयबद्दल मोहित मलिक म्हणतात: प्रत्येक भूमिकेत समरस झाल्याने शांती मिळते, मग ती शिव असो किंवा वडील, याची या मालिकेने मला आठवण करून दिली



**मुंबई, १६ नोव्हेंबर :** सोनी सबवरील गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय भगवान शिव आणि त्यांच्या स्वर्गीय कुटुंबाचे एक दिव्य, पण सखोल संबंधित चित्रण सादर करते. हा शो प्रेक्षकांना भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेणू पारीख) आणि त्यांचे पुत्र भगवान गणेश (एकांश कथरोटिया) व भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या कमी ज्ञात कथांची झलक दाखवतो, त्यात पौराणिक कथा, तत्त्वज्ञान आणि भावनांचे मिश्रण असते. दिव्यत्वाची भव्यता नेहमीच उपस्थित असली तरी या कथेला खरोखर वेगळे करणारी गोष्ट म्हणजे शिव परिवारातील भावनिक बंध, कौटुंबिक धडे आणि मानवी जीवनाचे प्रतिबिंब असलेल्या प्रेम आणि संतुलनाचे क्षण यांचा शोध.

या हृदयस्पर्शी संभाषणात मोहित मलिक भगवान शिव यांना मानवतेशी देवत्वाचे संतुलन साधण्याचा त्यांचा प्रवास, त्यांची तयारी प्रक्रिया, सेटवरील अनुभव आणि आगामी ट्रॅकमध्ये प्रेक्षक काय अपेक्षा करू शकतात, याबद्दल स्पष्टपणे सांगतात.

१. या शोमध्ये भगवान शिव केवळ देवता म्हणूनच नव्हे, तर एक पती आणि वडील म्हणून दाखवले आहेत. प्रेक्षक ज्याच्याशी जोडले जाऊ शकतात अशा अधिक मानवी, संबंधित कुटुंबातील पुरुषासह तुम्ही दैवी व्यक्तिरेखेचे संतुलन कसे साधले?

संतुलन हा भगवान शिवाची भूमिका साकारण्याचा सर्वात आकर्षक भाग होता. मला हे दाखवायचे होते की, त्यांची शांतता आणि दिव्यता जागरूकतेतून येते, अलिप्ततेतून नाही. एक पती आणि वडील म्हणून तो खोलवर उपस्थित असतो, कुटुंबासोबत संयन बाळगतो, तरीही नेहमीच मोठ्या उद्देशाने मार्गदर्शन करतो. म्हणून आभा दिव्य असली तरी भावना खूप मानवी आहेत. हे मिश्रण भगवान शिवांना सार्वत्रिकरीत्या जोडलेले बनवते.

२. ही तुमची पहिली पौराणिक भूमिका आहे – तुम्ही आतापर्यंत साकारलेल्या आधुनिक काळातील पात्रांपेक्षा हा अनुभव किती वेगळा आहे?

ही पूर्णपणे वेगळी आहे. आधुनिक पात्रे बाह्य परिस्थितीतून येतात; पौराणिक कथांना अंतर्गत प्रवासाची आवश्यकता असते. संवाद सादरीकरण, देहबोली, अगदी शांततादेखील अर्थपूर्ण आहे. मला बरेच काही शिकावे लागले आणि प्रत्येक दृश्याकडे आध्यात्मिक शिस्त आणि स्थिरतेने पाहावे लागले. थोडक्यात नम्रतेने पाहावे लागले.

३. पडद्यावर इतक्या शांत, पण शक्तिशाली देवतेचे चित्रण करण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी करावी लागते?

खूप अंतर्गत तयारी करावी लागते. मी भगवान शिवाचे विविध अर्थ वाचून आणि पाहून सुरुवात केली, शास्त्रांपासून ते आधुनिक कथांपर्यंत. पण, अखेर मला जाणवले की, शांतता साकारता येत नाही; ती अनुभवावी लागते. मी स्वतःला जमिनीवर आणण्यासाठी शूट करण्यापूर्वी ध्यान करायला सुरुवात केली. भगवान शिवामधील शक्ती त्यांच्या संयमात आहे, म्हणून मी भव्यतेपेक्षा शांततेवर लक्ष केंद्रित केले.

४. चित्रीकरणादरम्यान असे काही क्षण होते का ,ज्यांनी तुम्हाला तुमच्या स्वतःच्या जीवनावर (पती, वडील, अभिनेता म्हणून) नवीन मार्गांनी चिंतन करायला लावले, शिवाच्या भूमिकेने किंवा शिव परिवाराच्या कथेने प्रेरित होऊन?

हो. शिव परिवार कर्तव्य आणि प्रेम, अलिप्तता आणि काळजी यांच्यातील संतुलन दर्शवितो. भगवान शिवाची भूमिका साकारताना मला हे विचार करायला भाग पडले की, आपण जीवनात आपल्या भूमिका आपल्याला किती वेळा वेगवेगळ्या दिशेने खेचू देतो? यावरून मला आठवण झाली की, शांतता ही कमी काम केल्याने मिळत नाही, तर आपण जे काही करतो त्यात समरस झाल्याने मिळते.

५. हा शो शिवाचे पार्वती, गणेश आणि कार्तिकेय यांच्याशी असलेले बंधन सुंदरपणे उलगडतो. या दैवी भूमिका साकारणाऱ्या तुमच्या सहकलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे?

खूप छान आहे. पडद्यावरची केमिस्ट्री ही पडद्याबाहेर आपण सामायिक करत असलेल्या सहजपणाचे प्रतिबिंब आहे. आपली देवी पार्वती तिच्या अभिनयात अशी कृपा आणते आणि भगवान गणेश व भगवान कार्तिकेय यांची भूमिका करणारे कलाकार खऱ्या शिव परिवाराची कल्पना कशी करतात त्याप्रमाणेच ऊर्जा आणि निरागसतेने भरलेले आहेत. आपण अनेकदा खऱ्या कुटुंबाप्रमाणे विनोद आणि रिहर्सल करतो.

६. तुम्ही सेटवरील एखादा मनोरंजक किस्सा किंवा संस्मरणीय क्षण सांगू शकाल का?

ध्यान अनुक्रमादरम्यान एक क्षण असा होता, जेव्हा सर्व काही शांत झाले, कोणतीही हालचाल झाली नाही, आवाज आला नाही, अगदी क्रूनेदेखील बोलणे थांबवले. ते अवास्तव वाटले, जणू काही दृश्याची ऊर्जा संपूर्ण सेटमध्ये भरून गेली होती. असे क्षण तुम्हाला आठवण करून देतात की, कथाकथन कधी कधी कामगिरीच्या पलीकडे कशाला तरी स्पर्श करू शकते.

७. गणेश कार्तिकेयच्या आगामी ट्रॅकमध्ये प्रेक्षक काय पाहण्याची अपेक्षा करू शकतात?

आगामी ट्रॅकमध्ये शिव परिवाराच्या भावनिक गाभ्याचा खोलवर उलगडा केला आहे. हा ट्रॅक भावांमधील बंध, त्यांची कर्तव्याची जाणीव आणि भगवान शिव व देवी पार्वती त्यांना मानवी संघर्षांचे प्रतिबिंब असलेल्या दैवी धड्यांमधून कसे मार्गदर्शन करतात याचा शोध घेतो. हा ट्रॅक हृदयस्पर्शी, दृश्यदृष्ट्या आश्चर्यकारक आणि आध्यात्मिक अर्थाने परिपूर्ण आहे.

# बाप 'नंबरी', बेटा 'दसनंबरी'!

केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुण्यातील जैन बोर्डिंग विक्री संदर्भातील भ्रष्टाचाराच्या 'मोहोळा'च्या बातमीची शाई वाळत नाही तोच, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र (?) पार्थ पवार याने पुणे येथे तर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मीरा-भाईंदर येथील २०० कोटींची जमीन केवळ ३ कोटींत घेतल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. मुरलीधर मोहोळ आणि प्रताप सरनाईक यांच्या घोटाळ्याच्या बातमीने धक्का बसला. परंतु, पार्थ पवारने जमीन घोटाळा करून पवार कुटुंबात 'हमभी किसीसे कमी नही' हे दाखवून दिले. त्यामुळे पार्थच्या 'पराक्रमा'चे फारसे आश्चर्य वाटले नाही. तोंडावरून माशीही न उडणा-या पार्थला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. त्या बिचा-याने आपल्या खानदानाची 'भ्रष्टाचारा'ची परंपरा पुढे चालू ठेवली आहे, इतकेच.

आजोबा 'बारामती'चे 'करामती' काका, 'अकेला देवेंद्र क्या करेगा' असा सतत प्रश्न विचारणारी त्यांची लाडकी लेक आणि त्यांचे पती, यांच्यावर 'लवासा'च्या भ्रष्टाचाराचा ठपका अनेक वर्षांपासून आहे. त्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे की प्रकरण गुंडाळले? हे भ्रष्ट प्रशासन,भ्रष्ट कारभारी आणि ब्रह्मदेवच जाणो. तसाच प्रकार अजितदादांच्या बाबतीतही झाला आहे. शिखर बँक आणि जलसिंचन घोटाळ्यात ७० हजार कोटी (?) रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप झालेला आहे. त्याचीही चौकशी झाली नाही. उलट जनतेच्या 'नाकावर टिच्चून' ते पुन्हा उपमुख्यमंत्री झाले. काकांचा दुसरा पुतण्या रोहित पवार याच्यावरही 'बारामती ग्रो' कारखाना स्वस्तात 'ढापल्या'चे आरोप झालेले आहेत. त्याच्याही चौकशीचे काय गौडबंगाल आहे? हे समजत नाही. अनेक सहकारी संस्था, साखर कारखाने, शिक्षण संस्था, जमिनी बळकावणा-या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाच्या गारुडावर बसलेल्या 'दगाबाज' काकाच्या नातवाने पुण्यात १७०० की २३००(?) कोटींची जमीन अवघ्या ३०० कोटींत आणि तीही केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरून विकत घेतली असेल तर, त्यात कोणाला आश्चर्य वाटायला नको. त्याने आपल्या रक्तात आपल्या खानदानाचा भ्रष्टाचाराचा 'डीएनए' पुरेपूर समाविष्ट आहे, हे दाखवून दिले आहे. पण, याच्या या 'कांडा'मुळे पुन्हा एकदा 'मंत्र्यांचे नातेवाईक, बगलबच्चे आणि पोरं सत्ता, संपत्तीच्या जीवावर कसा माज, मस्तवालपणा करतात, 'हा मुद्दा ऐरणीवर आला, हे मात्र नक्की.

अजित पवार आणि कुटुंबाने आपल्या 'दिवट्या'च्या पराक्रमाची जी पाठराखण केली, त्याला तोड नाही. सुमारे सहा-सात महिन्यांपासून या 'कांडा'ची खिचडी शिजत होती. पण, राज्याचे उपमुख्यमंत्री (?) अजित पवार यांनी, 'मला याप्रकरणाची अजिबात माहिती नव्हती', असे म्हणत, हात वर केले. सुपुत्र तब्बल ३०० कोटींचा व्यवहार करतो; आणि बापाला याची कानोकानी खबर नसावी? सर्वसामान्य माणूस पोराने १०० रुपये जरी मागितले तरी कशासाठी पाहिजेत? असा प्रश्न दहा वेळा विचारतो. पण ३०० कोटींच्या व्यवहाराची बापाला भणकही नाही. खरेच पार्थने नशीब काढले. आपण अशा श्रीमंत कुटुंबात जन्म का घेतला नाही, अशी खंत मनात आल्याशिवाय राहत नाही. दादांच्या या अतिशय बेजबाबदार आणि खोट्या विधानावर शेंबडं पोरगं तरी विश्वास ठेवील का? जर दादा खरे बोलत असतील. तर, बापाला काहीही न सांगता पार्थने एवढे मोठे 'कांड' करून बाप 'नंबरी' तर बेटा 'दस' नंबरी हे सिद्ध करून दाखवले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यानंतरही रोज वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत दादांनी आपल्या भूमिका बदलल्या. दादा अगदी झटक्यात आणि कडक बोलत भूमिका का बदलत आहेत? याचे उत्तर काहींनी शोधले. त्यांच्या दुस-या सुपूत्राची 'टँगो पंच' नावाच्या 'देशी' दारूची फॅक्टरी आहे. त्याचा हा परिणाम असावा. सत्तेतील कोण्या कारभा-याचे प्रकरण बाहेर आले तर, त्यांच्यासह फडणविसांचा राजीनामा मागणा-या आत्याबाईनेही 'पार्थ असे काही करणार नाही', असे म्हणत भाचाच्या गुन्ह्यावर पांघरून घातले. आश्चर्य आणि हसू आले ते काकांच्या प्रतिक्रियेचे. 'सुप्रिया सुळेंचे हे वैयक्तिक मत आहे. (तोच घिसापिटा डायलॉग) राजकारण आणि कुटुंब याचा काहीही संबध नाही'. वा काका! सॅल्युट आहे तुम्हाला. निवडणुका येतात तेव्हा तुमची ही भूमिका कोठे जाते? सतरंज्या उचलणा-या निष्ठावान कार्यकर्त्यांऐवजी नातेवाईक, कुटुंब, बगलबच्चे यांना तिकिटे देताना राजकारण आणि कुटुंबाचा कसा संबंध येतो? हे एकदा स्पष्ट केले तर, बरे होईल. कुटुंबातील पाच सदस्य लोकप्रतिनिधी आहेत. पण, अजूनही हाव सुटत नाही. कारण, 'सत्ता आणि घोटाळे' हे पवार कुटुंबाच्या राजकारणाचे समीकरणच झाले आहे,

सुमारे १५ वर्षे 'उपमुख्यमंत्री' पदावर ठाण मांडून बसलेले आणि 'मुख्यमंत्रिपदा'चे स्वप्न पाहणारे अजितदादा याआधी अनेकवेळा अडचणीत आले आहेत. परंतु दिवट्याच्या या 'कांडा'मुळे त्यांच्यावर 'मंत्र्यांचं पोरं आणि जीवाला घोरं' असे म्हणण्याची नक्कीच वेळ आली आहे. अर्थात, ही काही पहिलीच घटना नाही. २६/११ ला मुंबईत दहशतवादी हल्ला झाला होता. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे निर्माता रामगोपाल वर्मा याला हॉटेल ताजमध्ये घेऊन गेले होते. त्यावरून बराच गदारोळ होऊन त्यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले होते. रामगोपाल वर्मा त्यांच्या मुलासाठी (अमित देशमुख) एक फिल्म बनवत होता. तसेच मनोहर जोशी यांनाही आपला जावई गिरीष व्यास याच्या एका प्रकरणात मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले होते. एकनाथ खडसे यांचीही जावयाच्या भोसरी जमीन प्रकरणी गच्छंती झाली होती. माजी मंत्री तानाजी सावंत यांचा मुलगा ऋषिराज सावंत, समाज कल्याणमत्री संजय शिरसाट यांचा मुलगा सिध्दांत शिरसाट, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा मुलगा अजय आदित्य गोरे, प्रकाश सुर्वे यांचा मुलगा राज सुर्वे, राष्ट्रवादीचे राजेंद्र हगवणे याची दोन मुले या सर्वांनी आपल्या बापांची अब्रू राज्याच्या वेशीवर टांगली आहे. माजी मुख्यमंत्री (?) उध्दव ठाकरे यांनाही आपल्या सुपूत्रांमुळे टीकेचे धनी व्हावे लागले होते. कोरोना काळात सर्व सामान्यांसाठी सर्व काही बंद असतानाही, तेजस ठाकरे मात्र एका बारमध्ये आपल्या मित्र-मैत्रिणींसह लाखो रुपयांची दारू रिचवत होते. तर, 'नाईट लाईफ'ची आवड असणा-या आदित्यच्या 'दिशा सालियन' प्रकरणामुळे उध्दव ठाकरे यांना बदनामी सहन करावी लागत आहे.

मुरलीधर मोहोळ यांच्या जमिनीचा व्यवहार रद्द झाला. त्याचप्रमाणे पार्थ पवारचाही व्यवहार रद्द झाला. थोडक्यात, गोमूत्र शिंपडून हे दोघेही पवित्र झाले. खरेतर मुरलीधर मोहोळ आणि अजित पवारांनी नैतिकता दाखवून तातडीने राजिनामे द्यायला हवे होते. व्यवहार रद्द झाले, याचा सरळ असाच अर्थ होतो की, दोन्ही व्यवहार झाले होते म्हणजेच भ्रष्टाचार झाला होता. कायद्यानुसार दोघांवरही गुन्हे दाखल होणे क्रमप्राप्त होते, पण तसे झाले नाही. कारण एक केंद्रीय मंत्री आहे. तर, दुसरा उपमुख्यमंत्र्याचा दिवटा. याच ठिकाणी कोणी सर्व सामान्य नागरिक असते तर, आतापर्यंत ते गजाआड गेले असते. कायदा बनविणारेच तो कसा पायदळी तुडवतात? याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे, काही महिन्यांपूर्वी शरद पवार यांनी आपला वाढदिवस साजरा केला होता. (कितवा, हे सांगू शकत नाही. कारण ते आजही म्हणतात की, मी अजूनही तरुण आहे) यावेळी त्यांनी सार्वजनिक ठिकाणी अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि पोलिसांसमोर तलवारीने केक कापला होता. तलवारीने केक कापणे हा गंभीर गुन्हा आहे. पण, काकांवर आजपर्यंत गुन्हाही दाखल झाला नाही; साधी विचारपूसही झाली नाही. परंतु, अशाच घटनात अनेक सर्वसामान्य नागरिकांची धिंड काढत त्यांना तुरुंगातही डांबण्यात आले आहे. मुंबईत एका व्यक्तीने आपल्या घरात कुटुंबासह तलवारीने केक कापला होता. काही दिवसांनी पोलिसांना याची कुणकुण लागली. आमचे कर्तव्यदक्ष पोलीस तातडीने त्याच्या घरी पोहोचले. गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले. पण, याच पोलिसांनी शरद पवारांच्या बाबतीत डोळ्यावर पट्टी बांधली होती. यावरून हेच सिद्ध होते की, कायदे हे फक्त सर्व सामान्य माणसांसाठी बनविले जातात; आणि ते काटेकोरपणे पाळण्याची जबाबदारीही त्यांचीच असते.

मुद्दा हा आहे की, राज्यातील अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी, पदाधिका-यांच्या या आणि अशा अनेक माजुरड्या आणि मस्तवाल औलादींवर अनैतिक संबंध, विनयभंग, खून, जमिनी बळकावणे, अपहरण, हाणामारी, धमकावणे आदींसारख्या 'तालिबाणी' कारवायांचे अनेक गुन्हे दाखल आहेत. या दिवट्यांनी कायदा धाब्यावर बसवत, महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा अगदी रसातळाला मिळवत, जणू काही महाराष्ट्राचा बिहार करण्याचा 'विडाच उचलला' आहे की काय? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. तलवारीच्या पात्यावर बसलेल्या या राजपुत्रांच्या कारनाम्यांमुळे आपल्या बापाची, कुटुंबाची बदनामी होते. सुसंस्कृत महाराष्ट्राची अब्रू जगाच्या वेशीवर टांगली जाते, एवढीही अक्कल यांना नसावी, याचे आश्चर्य आणि वाईटही वाटते. परदेशात नामांकित कॉलेजात उच्चशिक्षण घेऊन तुमचा उपयोग काय? की, अशाच गोष्टींचे शिक्षण तेथे घेतात? राजकारण्यांनो, 'उघडा डोळे आणि बघा नीट'. आता तरी खडबडून जागे व्हा. स्वतःच्या या बिघडलेल्या आणि पैसा, सत्तेचा माज असलेल्या नतद्रष्ट्य, नालायक औलादी समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. त्यांना वेळीच वठणीवर आणा, असा सल्ला देण्याची वेळ आली आहे. खरे म्हणजे, अशा ४/५ दिवट्यांवर कठोरात कठोर कारवाई होऊन त्यांना शिक्षा होणे, ही 'काळाची गरज' आहे. त्यामुळे 'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' यानुसार काही वठणीवर येऊन, असे पराक्रम करण्यास धजावणार नाहीत. पण, सत्तेच्या ढेपेला चिटकणा-या मुंगळ्यांचे संख्याबळासाठी आतून 'साटे-लोटे' असल्याने 'मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार '? हा मोठा कळीचा मुद्दा आहे.

**प्रदीप खोलमकर, नाशिक.**
**मोबाईल ८७६७५९२९८०**

# कॉमेडी किंग भाऊ कदम झाला 'सिरियल किलर'?



**मुंबई, १६ नोव्हेंबर :** लोकप्रिय कॉमेडी वीर अभिनेता भाऊ कदमला कोणत्याही ओळखीची गरज नाही. भाऊ कदम आणि विनोद हे समीकरण पक्क आहे. नेहमीच सगळ्यांना खळखळून हसवणारा हाच भाऊ कदम आता शार्प शूटर 'सिरियल किलर' ठरला आहे. तुम्हालाही हे वाचून धक्का बसला ना... तर त्याचं आहे असं की भाऊ कदम काय खरंच शार्प शूटर 'सिरियल किलर' झाला नाही तर तो 'सिरियल किलर' या नाटकातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

अद्वैत थिएटर्स आणि सिंधु संकल्प एन्टरटेनमेंट प्रा. लि. प्रस्तुत, राहूल भंडारे आणि प्रणय तेली निर्मित आणि केदार देसाई लिखित दिग्दर्शित सिरियल किलर हे धमाल नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात भाऊ कदम यांची मध्यवर्ती भूमिका असून त्यांच्या जोडीला अभिनेत्री अश्विनी कुलकर्णी, श्रद्धा हांडे,तेजस पिंगुळकर या नाटकात धमाल उडवणार आहेत.

मालिका अभिनेत्री आणि रिपोर्टर यांच्यामध्ये घडलेल्या घटनेने संशयाचे सुरुंग पेरले जातात. या घटनेनंतर 'सिरियल किलर' म्हणून आलेला खरंच 'सिरियल किलर' असतो की नसतो? याचा धमाल खेळ रंगतो आणि तो किती गमतीशीर असणार हे पाहण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत. फुल टू कॉमेडीच्या रॅपरमध्ये गुंडाळून आलेला 'सिरियल किलर' काय धमाल उडवतो हे पाहणं रंजक ठरणार आहे.

बेभान कॉमेडी आणि निखळ आनंदासोबतच आमच्या सगळ्यांच्या भन्नाट ट्यूनिंगची ट्रीट देणारं 'सिरियल किलर हे नाटक प्रेक्षकांना निखळ आनंद देईल असा विश्वास अभिनेते भाऊ कदम यांनी व्यक्त केला आहे.

नाट्यरसिकांना नेहमी काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न अद्वैत थिएटर्सने केला आहे. सिरियल किलर च्या माध्यमातूनही आम्ही सस्पेंस धमाल अशी नाट्यकृती आणली असून भाऊ कदमच्या चाहत्यांसाठी हे नाटक मनोरंजनाची दिलखुलास पर्वणी असणार आहे. नाटकाचे नेपथ्य प्रदीप मुळ्ये यांचे आहे तर संगीत विजय गवंडे यांचे आहे. प्रकाशयोजना श्याम चव्हाण यांची आहे. सूत्रधार सुनील पानकर गोट्या सावंत आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमच्याकडे उत्पन्नाचे नवीन स्रोत असतील, तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. आज तुम्हाला कला आणि साहित्य क्षेत्रात रस असेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. एखाद्या नातेवाईकाकडून काही चांगली बातमी मिळेल. तुमचा जोडीदार आज तुम्ही जे काही बोलता ते समजून घेण्याचा प्रयत्न करेल, यामुळे नात्यात ताजेपणा येईल.

**मिथुन :** आज अपेक्षित यश मिळेल. नोकरी करणाजयांना प्रमोशन किंवा नवीन जबाबदाजया मिळू शकतात. जमीनतून फायदा होऊ शकतो. तुमचं आरोग्यही उत्तम राहील.

**कर्क :** आज तुम्हाला नवीन कामे करण्यात नशिबाची पूर्ण साथ मिळेल. तुमच्या कारकिर्दीत तुम्ही नवीन आयाम स्थापित कराल. कुटुंबातील सदस्याला सरकारी नोकरी मिळाल्यास वातावरण आनंददायी असेल.

**सिंह :** आरोग्यात सुधारणा होईल. भाऊ-बहिणींना मदत करावी लागेल. नात्यातील अडचणी कमी होतील. नोकरी शोधणाजयांना चांगली बातमी मिळू शकते. परंतु कान, घसा किंवा नाकाची काळजी घ्या.

**कन्या :** आज तुम्ही दैनंदिन कामांमध्ये जास्त वेळ घालवू शकता. व्यवसायात पैसे गुंतवण्यापूर्वी आज तुमच्यासाठी वडीलधाजयांचा सल्ला घेणे चांगले राहील. आज संपत्तीत वाढ होईल.

**तुळ :** मन धार्मिक कामात आणि चांगल्या गोष्टींमध्ये लागेल. शिक्षण किंवा परदेशातून चांगली बातमी मिळेल. वडिलोपार्जित संपत्तीतून फायदा होण्याचे संकेत आहेत. कामाच्या ठिकाणी तुमच्या प्रयत्नांची प्रशंसा होईल.

**वृश्चिक :** आज रागावर नियंत्रण ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. खर्च वाढू शकतो. ज्यामुळे आर्थिक नियोजन बिघडेल. कामाच्या संदर्भात बाहेर जावं लागू शकतं. कोणताही निर्णय घेताना घाई करु नका.

**धनु :** आज कामात यश मिळेल. तुमचे प्रयत्न तुम्हाला यश मिळवून देतील. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध अधिक दृढ होतील.

**मकर :** थांबलेली कामं आज पूर्ण होतील. आर्थिक स्थिती सुधारेल. शत्रूंवर विजय मिळवता येईल. नोकरीत बढतीची शक्यता आहे. कुटुंबातील सदस्यांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. धनप्राप्तीचे योगही आहेत.

**कुंभ :** व्यवसायात चांगले परिणाम मिळतील. पण अज्ञात भीतीने अस्वस्थ होईल. घरातील प्रश्न शांतपणे आणि समजूतदारपणे सोडवा. खर्चावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असणार आहे. तुमचा बॉस तुम्हाला एक नवीन जबाबदारी देऊ शकतो जी तुम्ही पूर्ण समर्पण आणि कठोर परिश्रमाने पार पाडाल, तुमच्या कामाची प्रशंसा होईल.

# शब्दकोडे क्रमांक २२७०



**आडवे शब्द :-**

१) सन्मान, मान ****
४) महाराष्ट्राचे नंदनवन
६) दयाळू
१०) विश्व
११) बंगाली चलन
१२) नातेवाईक
१३) अंगावरील बारीक केस
१५) ऐतिहासिक लिखाण
१८) पचपचीत, बेचव
१९) ओलसर
२१) फळांचा राजा
२३) व्यायाम
२४) रसाळ
२५) जन्म-मृत्यू
२८) मूळ आधार
२९) लहान
३०) एकरूप
३२) पाणी
३४) संशय (हिं.)
३५) प्रेत (हिं.)
३७) गणपतीचे एक नाव
३८) तात्काळ, लगेच
३९) आयातकर स्वीकारण्याची जागा
४१) धपाटा
४३) राजसभा
४५) सत्वांश
४७) नाश करणारा
४९) साला मै तो ** बन गया एक हिन्दी गीत, साहेब
५१) रेचक
५४) पातळ खांब
५६) वणवा
५७) रेशीमाचे जाडसर कापड
५९) वयाने जास्त असलेली नवरी
६१) माणूस, व्यक्ती
६२) गव्हाचे बारीक पीठ
६३) हात
६४) कायदेशीर
६९) लाकडी जिना
७०) विटी कोलण्याचा लहानसा खड्डा
७१) जंगलातील प्राणी
७३) अनेक नवीन प्रकार
७४) फुरसत
७५) पार्वतीच्या वडिलांचे नाव, सावध
७६) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ

**उभे शब्द :-**

१) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२) संताप
३) दोरीच्या सहाय्याने उघडझाप करता येणारी पिशवी
५) कौशल्य
६) विश्वासघात
७) एक द्विदल धान्य
८) लोणी
९) इच्छापूर्तीसाठी केलेले नवसादि प्रकार
१२) पावसाची झड
१४) हड्डी
१६) खोदकाम
१७) बैलाच्या नाकातला दोर
२०) चामखीळ
२२) भाकरीचे एक धान्य
२३) हात, सारा
२६) नकला करणारा
२७) मनाची इच्छा
२८) झाडाभोवतीचा कट्टा
२९) किंचित वक्रता
३०) आठवण
३१) दहावी रास
३३) किंचित अंश
३४) एक ऋतू
३६) शंभर
३७) उत्कर्ष
३९) जिम्मेदारी, जोखीम
४०) श्वसनेंद्रिय
४२) बासरी
४४) पृथ्वी
४६) नवऱ्याचा भाऊ
४७) कापडी बंद, धमनी
४८) दरवाजा
५०) अनादर, संकोच
५१) सरसनीरस
५२) रचलेले कारस्थान
५३) हिंदीत प्रेम
५५) छोटी ताटली
५८) जुगार
५९) नशा आणणारा एक पदार्थ
६०) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
६१) वकीलाचे कूळ
६२) चेहरा, मुख
६४) अधिक श्रेष्ठ, वरचढ
६५) पत्थर
६६) वर्ष, साल
६७) मीठाची चव
६८) पर्ण
७१) छाती
७२) स्वाद, रुची

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# रेल्वेची किंमत किती?



मुंबईकरांसाठी ट्रेन तर 'लाईफ लाईन' आहे; पण ट्रेन बनवण्यासाठी किती खर्च येतो तुम्हाला माहिती आहे? सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगायची झाली, तर भारतीय रेल्वेने दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. सामान्य डब्यांपासून ते वातानुकूलित डब्यांपर्यंत प्रत्येक डब्याचं बजेट वेगळं असतं.

ट्रेन बांधण्यासाठी मोठा खर्च येतो. प्रवाशांना तिकिटासाठी फक्त काही हजार रुपये मोजावे लागतात, परंतु एका ट्रेनची किंमत सत्तर कोटी रुपयांपर्यंत असू शकते. एका रिपोर्टनुसार, भारतीय रेल्वेच्या इंजिनची किंमत १५ ते वीस कोटी रुपयांपर्यंत असते. भारतात दोन प्रकारची रेल्वे इंजिन्स तयार केली जातात. एक डिझेल आणि दुसरे इलेक्ट्रिक. सुमारे ५२ टक्के भारतीय गाड्या अजूनही डिझेल इंजिनवर चालतात, पण रेल्वे हळूहळू विद्युतीकरणाकडे वाटचाल करत आहे. डिझेल इंजिनची किंमत सुमारे १३ कोटी आहे. ड्युअल-मोड इंजिनची किंमत सुमारे १८ कोटी आहे. इलेक्ट्रिक इंजिनची किंमत सुमारे वीस कोटी आहे.

एका एक्सप्रेस ट्रेनमध्ये २४ कोच असतात आणि प्रत्येक कोचची निर्मिती किंमत सुमारे दोन कोटी रुपये असते. सर्व कोचची एकूण किंमत सुमारे पन्नास कोटी रुपये असते. इंजिनची किंमत जोडल्यास, एक्सप्रेस ट्रेनची सरासरी किंमत सुमारे सत्तर कोटी रुपये होते. याव्यतिरिक्त, अतिरिक्त बर्थ आणि सुविधांमुळे स्लीपर कोच अधिक महाग असतात. वातानुकूलन, प्रगत इन्सुलेशन आणि इलेक्ट्रिकल सिस्टिमने सुसज्ज असलेले एसी कोच सर्वात महाग असतात.

बहुतेक गाड्या आणि लोकोमोटिव्ह स्थानिक पातळीवर भारतीय रेल्वेच्या स्वतःच्या उत्पादन सुविधांमध्ये उत्पादित केले जातात. चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स, डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्स आणि इंटिग्रल कोच फॅक्टरी या ठिकाणी उत्पादनाच्या सुविधा आहेत. यामुळे उत्पादनाचा खर्च तर कमी होतोच, पण रेल्वे क्षेत्रातील मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या भारताच्या उद्दिष्टांना बळकटी मिळते.

# कॅलिडोस्कोप

# हिंदी महासागरात मोठे छिद्र

हिंदी महासागरात भूस्वरूप कमी आहे. तज्ज्ञांच्या मते, हे जगातील सर्वात मोठे गुरुत्वाकर्षण छिद्र आहे. शास्त्रज्ञ संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून पृथ्वीच्या आतील भागात असलेल्या विविध वस्तूंबद्दल सखोल माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे महासागरांमधील भयानक 'ब्लॅक होल' उघडण्यास मदत होईल.

**भूरूप म्हणजे काय?**

भारताच्या दक्षिणेस असलेल्या हिंदी महासागरात, एक विचित्र भूवैशिष्ट्य आहे, म्हणजेच 'भूगर्भ'. ते एका दृष्टिक्षेपात नकाशासारखे दिसते. सहसा नकाशानुसार समुद्राचा पृष्ठभाग असमान असणे अपेक्षित असते. केवळ पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणात मोठ्या प्रमाणात बदल झाल्यामुळे 'आयओजीएल' सारख्या काही महासागरांचा पृष्ठभाग रिकामा होतो. हे जग आकर्षणाचे केंद्र आहे, कारण समुद्रतळ खूप सामान्य आहे आणि तेथे ज्वालामुखीसारखी कोणतीही वस्तू नाही. म्हणूनच, येथे ज्वालामुखी नसले, तरी येथे गुरुत्वाकर्षण इतके कमी का आहे, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

**उकल करण्याचा प्रयत्न**

२०२३ मध्ये भारतीय विज्ञान संस्थेच्या शास्त्रज्ञांनी एका बदलाद्वारे ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना १४० दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीची निर्मिती कोणत्या हालचाली आणि कोणत्या पद्धतीने झाली याचे संगणकीय चित्रण सापडले. गुरुत्वाकर्षणाचा अभाव होता असलेल्या प्रत्येक ठिकाणी ही बाब लक्षात आली. तपासणीनंतर सार्वजनिक केलेल्या अहवालांनुसार, पूर्वी समुद्राच्या तळाचे तुकडे अधिक रिकामे झाले. त्यामुळे उबदार आणि कमी घनतेचे धुके असलेले वस्तुमान तयार झाले. यावरून गुरुत्वाकर्षणाची चिन्हे आढळली. समुद्राखालील भागात अनपेक्षित आणि कोट्यवधी वर्षे जुन्या घटना किंवा त्यांच्यामुळे होणारी अशांतता किंवा जाडी याबद्दल तपशीलवार माहिती 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स'मध्ये प्रकाशित केली जाते.



# घटस्फोटानंतर मुलावर दुग्धाभिषेक

लग्नात आनंदसोहळा साजरा करणे ही सामान्य गोष्ट असते; पण एखाद्यानं घटस्फोटाचं मोठं सेलिब्रेशन केलं, हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल. एका तरुणाला त्याच्या आईने दुधानं अभिषेक घातला. त्यानंतर 'सुखी घटस्फोट' असा लिहिलेला केक कापून जंगी सेलिब्रेशन करण्यात आले.

काहींनी या कृतीवर टीका केली असली, तरी काहींनी युवकाच्या 'नव्या सुरुवातीचा' आनंद साजरा करण्याच्या पद्धतीचे कौतुकही केले आहे. याबाबत 'सोशल मीडिया'वरील वृत्तानुसार, युवकाची आई त्याच्यावर दूध ओतून त्याचा अभिषेक करत आहे. हिंदू संस्कृतीत अभिषेक हा शुद्धीकरण आणि नव्या सुरुवातीचा प्रतीक मानला जातो. त्यानंतर युवक 'सुखी घटस्फोट' असे लिहिलेल्या चॉकलेट केकजवळ येतो आणि हसतमुखाने तो केक कापतो. केकवरच त्याने लिहिले होते, की मी माझ्या माजी पत्नीला १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रुपये दिले आहेत. त्याने लिहिले, कृपया आनंदी राहा, स्वतःचा सन्मान करा. १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रुपये दिले आहेत, घेतले नाहीत. आता मी सिंगल, खुश आणि मुक्त आहे. माझं जीवन, माझे नियम! घटस्फोटानंतरही आयुष्याकडं नव्या दृष्टीने कसं पाहता येऊ शकतं याबाबत एक वेगळा विचार या घटनेनं नक्कीच पुढे आणला आहे.



# आईवडीलांची तक्रार थेट देवाकडे!

लहान मुलं म्हणजे चमत्कारिकच असतात. त्यांना काय आवडेल हे सांगता येत नाही. तसंच ते कशावरून रागावतील हेही सांगता येत नाही. बरं, रागावल्यानंतर काय करतील याचाही नेम नाही. एका चिमुकलीने तर चक्क देवालाच पत्र लिहिलं. पत्रात देवाकडे आईवडिलांची तक्रार केली. तक्रारही गोड होती आणि कारणही गोडच होतं.

इंग्लडच्या सॉमरसेटमध्ये एका आठ वर्षाच्या चिमुकलीने आईवडिलांकडे एक पप्पी मागितली. आई वडिलांनी पप्पी देण्यास नकार दिला. त्यामुळे लाडोबाई रुसल्या अन् तिने चक्क देवाकडेच मम्मी पप्पांची तक्रार केली. रागावलेल्या मुलीने चक्क देवाला पत्र लिहिलं. बरं, मुलीने देवाला पत्र लिहिलं, ही काही मोठी गोष्ट नव्हती. पण जेव्हा सहा महिन्याने या पत्राचं उत्तर आलं, तेव्हा तिचे मम्मी पप्पाही आश्चर्यचकीत झाले. या पत्रातील उत्तरही मजेशीर होतं. तू कुत्रा पाळ असा सल्ला त्यात देण्यात आला होता. थेट देवाकडूनच उत्तर आल्याचं पाहून ही मुलगी जाम खूश झाली, पण हे पत्र आलं तरी कुठून? कुणी पाठवलं उत्तर? या विचारानेच मुलीच्या आईवडिलांना पछाडलं आहे.

या मुलीच्या आईने ही मजेशीर गोष्ट नाव न छापण्याच्या अटीवर सांगितली. कुणी पत्र पाठवलं हे समजलं नाही, पण या मागचं रहस्य मला खूप आवडलं. पत्राचं उत्तर मिळणं नेहमीच चांगलं वाटतं, असं या मुलीच्या आईने म्हटलं आहे. या मुलीच्या आईवडिलांनी मुलीचं पत्र आणि त्याला आलेलं उत्तर दोन्ही पत्रे रेडिटवर शेअर केलं आहे. माझ्या मुलीने देवाला लिहिलेल्या पत्राचं उत्तर कुणी दिलं? असं कॅप्शन रेडिटवर देण्यात आलं होतं.

या घटनेनंतर आता नवा पेच निर्माण झाला आहे. या मुलीच्या आईवडिलांनी हा पेच सांगितला. माझ्या आठ वर्षाच्या मुलीला पाळीव कुत्रे खूप आवडतात. आमच्याकडे आधी एक कुत्रा होता. पण ती वारंवार रेस्क्यू सेंटरमधून अजून एक कुत्रा आणण्याची मागणी करत होती. आम्ही तिला अजून एक कुत्रा घरी आणण्यास नकार दिला. त्यामुळे ती त्रस्त झाली आणि नाराजही झाली होती. त्यातच तिला आम्ही पप्पी दिली नाही. त्यामुळे तर तिचं नाक रागाने लालेलाल झालं. त्यानंतर ती बेडरूममध्ये गेली आणि एक बंद लिफाफा घेऊन बाहेर आली, असं या पत्रात म्हटलं.



तिने लिफाफा लेटर बॉक्समध्ये टाकला. सहा महिन्यानंतर तिच्या नावावर एक टाईप केलेलं पत्र आलं. एका प्रीपेड रॉयल लिफाफ्यात होतं. त्यावर परतीचा पत्ता नव्हता. पोस्टल विभागाचा शिक्काही नव्हता. केवळ हाताने लिहिलेलं पत्र होतं. ही चिठ्ठी मिळाल्यानंतर मुलीचे आईवडील घाबरून गेले होते. एक तासभर तणावात होते. नंतर त्यांना मुलीने लिहिलेलं पत्र आठवलं. या पत्रात कुत्रा दत्तक घेण्याचं माझं स्वप्न पूर्ण होईल का? असा सवाल या मुलीने केला होता. या पत्रात त्यावर उत्तर होतं. माफ करा. तुम्हाला पत्र लिहिण्यात उशीर झाला. ईश्वराला वाटतं तुझी या गोष्टीबाबत हरकत नसावी. देवानेच मला पत्र लिहायला सांगितलं आहे. देव प्रत्येकाची प्रार्थना ऐकतो. तो योग्यवेळी उत्तर देतो. तुला कुत्रा पाळण्याचा सल्ला दिला जात आहे, असं या चिठ्ठीत म्हटलं होतं. त्यानंतर या मुलीने कुत्रा पाळण्याचा हट्ट धरला.

# धातू खाणारा माणूस!

एखादा माणूस धातू, प्लास्टिक खाऊ शकतो, यावर आपला विश्वास बसणार नाही. सर्वसामान्य माणसाला विमान खाता येणार नाही. पण या जगात बऱ्याच चित्रविचित्र घटना घडत असतात. चमत्कार होत असतात. असाच एक चमत्कार म्हणजे मिचेल लोटिटो. मिचेल लोटिटो फ्रान्सचे रहिवासी होते. ते आपल्यासारखे भात, पोळी, भाजी, मांस, अंडी असे पदार्थ खाऊ शकत नव्हते. त्यांना धातूचे पदार्थ लागायचे. भात, पोळी, भाजी त्यांना पचायचंच नाही. पण लोखंडासारखा धातू ते अगदी सहज पचवायचे. १५ जून १९५० या दिवशी फ्रान्समधल्या ग्रेनोबेलमध्ये मिचेल यांचा जन्म झाला. सोळाव्या वर्षापासून ते धातूच्या वस्तू खाऊ लागले. मिचेल यांना पिको नावाचा आजार होता. हा आजार असणारा माणूस अन्न पचवू शकत नाही पण तो धातू अगदी सहज पचवू शकतो. सुरूवातीच्या काळात लोटिटो नखं, काचेचे तुकडे खात असत. विशेष म्हणजे ते काच अगदी सहज पचवायचे मात्र लोटिटो केळी, अंडी, ब्रेड हे पदार्थ पचवू शकत नव्हते. लोटिटोची ख्याती संपूर्ण जगात पसरू लागली. मग १९६६ पासून त्यांनी आपली ही असामान्य क्षमता जगापुढे सादर करायला सुरूवात केली. ते कार्यक्रम करू लागले. लोटिटो यांचे कारनामे बघण्यासाठी लोकांची गर्दी होऊ लागली. लोक तिकिट काढून त्यांचे कार्यक्रम बघायला येत. लोटिटो यांनी लोकांसमोर पलंग, टीव्ही, कॉम्प्युटर, सायकल तसंच धातूच्या विविध वस्तू खाल्ल्या. लोटिटो खनिज तेलही पित असत. धातू गिळणं सोपं जावं यासाठी ते खनिज तेल प्यायचे. लोटिटो यांनी १९७८ मध्ये एक विमान खायला सुरूवात केली. दोन वर्षांत म्हणजे १९८० पर्यंत त्यांनी हे विमान फस्त करून टाकलं होतं. १९५९ ते १९९७ या काळात मिचेल लोटिटो यांनी जवळपास नऊ टन म्हणजे ८१६४ किलो धातू खाल्ला होता. याच कारणामुळे त्यांचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं होतं. २५ जून २००७ या दिवशी त्यांचा मृत्यू झाला.




# मधुचंद्रात फुला-फळांची सजावट!



लग्नाचा हंगाम सुरू झाला आहे. लग्नाशी संबंधित अनेक रितीरिवाजांच्या चर्चा नेहमीच होत असतात, परंतु लग्नाच्या पहिल्या रात्री बेडरुम सजवण्यासाठी शक्यतो सुवासिक फुलांचा वापर होत असतो. पती आणि पत्नी पहिल्यांदा एकमेकांचे होतात. बिछान्यावर सुंगधित फुलांची सजावट केली जाते. परंतु एका घटनेत खोली फुलांबरोबरच फळांनी सजवलेली होती.

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधलेल्या असतात. दोन जीव रेशमच्या बंधनात अडकतात, तेव्हा त्यांच्यासाठी ही मधुचंद्राची रात्र एकमेकांना समजून घेण्यासाठी महत्वाची असते. मधुचंद्राच्या रात्रीसाठी घरातील बेडरुमला खूप सजवलेले असते. नवपरिणित वधू-वराला कसली अडचण होऊ नये, याची दक्षता घेतली जाते. त्यामुळे मंद सुंगधाच्या फुलांची उधळण केलेली असते.

व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये मधुचंद्राच्या रात्रीच्या एका खोलीचा भाग दाखवला आहे. या खोलीला फुलांनी सजवलेले दिसत आहे. निरनिराळी फुले या रुममध्ये मांडलेली दिसत आहे. बिछान्यावरदेखील फुलांचा सडा पडलेला दिसत आहे; मात्र यात एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे फुलांसोबत फळेही लटकवलेली आहे. या फळांमध्ये अननस आहेत. या फळांचा पडदा जणू तयार करण्यात आलेला आहे. गुलाबी आणि पांढऱ्या फुलांनी बिछान्यावर हृदयाचा आकार काढलेला आहे. मध्येच द्राक्षे, सफरचंद, अननस, डाळींबं, संत्री, टरबूज आदी फळे लटकलेली दिसत आहेत.

# पक्षी नव्हे, डायनासोर...



डायनासोरबद्दलचं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. डायनासोर नष्ट होऊन कोट्यवधी वर्षं लोटल्यानंतरही त्या युगाबाबत शोध सुरू आहे. शास्त्रज्ञांना अधूनमधून डायनासोरचे अवशेष मिळत असतात. मध्यंतरी म्यानमारमध्ये जगातल्या सर्वात छोट्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडले. हा डायनासोर पक्ष्यासारखा होता. अवघ्या दोन इंच आकाराचा हा डायनासोर हमिंगबर्डपेक्षाही छोट्या आकाराचा होता. झाडाच्या खोडातल्या फटीत डोकं अडकल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा डायनासोर ९९० लाख वर्षांपूर्वी अस्तित्वात होता, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हा डायनासोर परागकण खात नव्हता तर छोटे किडे आणि सुरवंटांना आपलं भक्ष्य बनवत असे. शास्त्रज्ञांनी संगणकावर याची प्रतिकृती तयार केली आहे. या डायनासोरच्या तोंडात १०० दात असल्याचं दिसून आलं. सर्वात छोट्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडल्यामुळे शास्त्रज्ञ डायनासोर युगाची उकल अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील.

अशा या अनोख्या पक्ष्याचे अवशेष सुरक्षित होते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. पक्ष्यासारखा डायनासोर सापडल्यामुळे शास्त्रज्ञांनीही आश्चर्य व्यक्त केलं आहे. या डायनासोरच्या शरीराची रचना अनोखी असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे. पक्ष्याच्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडणं ही सकारात्मक बाब म्हटली पाहिजे. यामुळे काळाच्या ओघात दडलेली बरीच गुपितं उलगडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# ३५ वर्षांनी हाती आले फोटो...

इंग्लंडमधल्या एका जोडप्याने तब्बल ३५ वर्षांनी आपल्या लग्नाचे फोटो बघितले. १९८५ मध्ये त्यांचं लग्न झालं होतं. मात्र लग्नाच्या दिवशीच एक बॅग चोरीला गेली. या बॅगेत दागिने, पैसे तर होतेच पण त्यांच्या लग्नाच्या फोटोंचा रोलही होता. २०२० मध्ये या जोडप्याच्या लग्नाला ३५ वर्षं पूर्ण झाले. मिक आणि ट्रेसी असं या जोडप्याचं नाव आहे. लग्नाच्या स्वागत समारंभादरम्यान दोन चोरांनी त्यांची बॅग चोरून नेली. काही लोकांनी या चोरांचा पाठलाग केला. पण चोर पळून गेले. चोरांनी पैसे, दागिने आणि कॅमेरा काढून बॅग रस्त्यावर टाकून दिली. या बॅगमध्ये लग्नप्रसंगी फोटो टिपणाऱ्या कॅमेऱ्यातला रोल होता. एंजी मखेल नावाच्या महिलेला ही बॅग सापडली. या बॅगमध्ये कॅमेऱ्यातला रोल होता. तिने फोटो डेव्हलप करून घेतले. हे कोणाच्या तरी लग्नाचे फोटो असल्याचं तिच्या लक्षात आलं. पण त्यावेळी संपर्काची साधनं नसल्यामुळे तिला या जोडप्याला फोटो देता आले नाहीत. हे फोटो तिने जपून ठेवले होते. घर बदलण्याच्या वेळी सामानाची बांधाबांध करताना एंजीला हे फोटो सापडले. मग तिने यातले काही फोटो फेसबुकवर शेअर केले. या फोटोतल्या जोडप्याला ओळखणाऱ्यांनी आपल्याशी संपर्क साधावा, असं आवाहनही केलं. ट्रेसीच्या नातेवाईकाने हे फोटो बघितले आणि तिला याची माहिती दिली. मग ट्रेसीने एंजीशी संपर्क करून घराचा पत्ता दिला. एंजीने हे सगळे फोटो २०२० मध्ये ट्रेसीच्या हवाली केले.



# मेक्सिकोतलं गूढ शहर

या पृथ्वीतलावरची अनेक गुपितं अजूनही उलगडलेली नाहीत. बरेच शास्त्रज्ञ ही गुपितं उलगडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. असंच एक गूढ गुपित म्हणजे मेक्सिकोमधलं टियाटिहुआकन नावाचं शहर. या शहराला 'प्लेस ऑफ गॉड' म्हणजे देवाची जागा असंही म्हटलं जातं. या शहराची निर्मिती कशी झाली, इथे कोण रहात होतं हे कोणालाही माहीत नाही. म्हणूनच या ठिकाणाबद्दल प्रचंड कुतुहल निर्माण झाल्याचं पहायला मिळतं. टियाटिहुआकन या शहरात असंख्य पिरॅमिड्स आहेत. एजटेक्स साम्राज्यातल्या लोकांनी चौदाव्या शतकात हे शहर शोधलं. त्यांनीच या शहराला टियाटिहुआकन असं नाव दिलं. त्याआधी या स्थानाला कोणतंही नाव नव्हतं. हे शहर म्हणजे एक चमत्कारच आहे. अनेकांना हे स्थान आपोआप प्रगट झाल्याचं वाटतं. या स्थानाचे उल्लेख कुठेही आढळत नाहीत. इथे एवढे पिरॅमिड्स कोणी बांधले हेही कोणाला माहीत नाही. या शहराची लोकसंख्या २५ हजारांच्या आसपास असावी, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या शहराचा परिसर खूप मोठा आहे. इथल्या एका पिरॅमिडच्या आत माणसांची हाडं सापडली होती. त्यामुळे हे स्थान अधिकच रहस्यमय बनून गेलं. या स्थानी माणसांचा बळी दिला जात होता, असंही काहींचं म्हणणं आहे.

# कुठे गेलं विमान?

बर्म्युडा ट्रँगल परिसरात बरीच विमानं, जहाजं गायब होतात. या विमानांचा काहीच पत्ता लागत नाही. बर्म्युडा ट्रँगलचं गूढ अद्यापही उकललेलं नाही. असंच एक गूढ गुपित काळाच्या पोटात दडलं आहे. मलेशियन एअरलाईन्सचं एक विमान असंच गायब झालं. आजतागायत त्या विमानाचा पत्ता लागलेला नाही. ही २०१४ ची घटना आहे. २३९ प्रवाशांसह मलेशियन एअरलाईन्सच्या विमानाने क्वालालंपूर विमानतळावरून उड्डाण केलं. हे विमान चीनची राजधानी बीजिंगला जाणार होतं. आठ मार्च २०१४ लाच हे विमान बीजिंगला पोहोचणार होतं. पण ते अचानक गायब झालं. या विमानाचा रडारशी संपर्क तुटला. त्यानंतर त्याचं काय झालं हे कोणालाही माहीत नाही. या विमानाचा शोध घेण्यासाठी बऱ्याच शोधमोहिमा राबवण्यात आल्या. पण हाती काहीच लागलं नाही. मलेशियन एअरलाईन्सच्या विमानाचा शोध घेण्यासाठी अनेक देशांनी सहकार्य केलं, मदत देऊ केली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. पण विमान आणि त्यातले प्रवासी काही केल्या सापडले नाहीत. या विमानात चीनच्या प्रवाशांची संख्या सर्वात जास्त होती. विमानाचा संपर्क तुटल्यानंतर अपहरण झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला. पण दहशतवाद्यांकडून कोणत्याही मागण्या झाल्या नाहीत. विमानाचा अपघात झाल्याची शक्यता लक्षात घेऊन त्या दृष्टीने शोध घेण्यात आला. पण सगळे प्रयत्न व्यर्थ ठरले. जवळपास एक लाख चौरस किलोमीटर परिसरात विमानाचा शोध घेण्यात आला. पण विमानाचे अवशेष किंवा प्रवाशांचे मृतदेह सापडले नाहीत. हे विमान नेमकं कुठे गेलं, त्याचं काय झालं याबाबत बरेच तर्कवितर्क लढवण्यात आले. पण आज सहा वर्षांनंतरही विमानाचा शोध लागलेला नाही.



### बिहार निवडणुकीतील उमेदवार स्थानिक नेत्यांच्या निर्णयानुसार

# आम्ही प्रचारात सहभागी नव्हतो : प्रफुल्ल पटेल

■ **महासागर प्रतिनिधी**
**गोंदिया, दि. १६ :**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने काही उमेदवार उभे केले होते, परंतु सर्वांचेच डिपॉझिट जप्त झाले. बिहारमध्ये निवडणूक लढवू नये असे मी सांगितले होते, पण प्रफुल्ल पटेल यांनी उमेदवार दिले असे अजित पवारांनी म्हटले होते. यानंतर प्रफुल्ल पटेल म्हणाले की, पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने निवडणूक लढविण्याचा आग्रह केला नव्हता. निवडणूक लढवावी, असा आमचा आग्रह नव्हता. मी प्रचारालाही गेलो नाही हा निर्णय स्थानिक नेत्यांनी घेतला.



प्रफुल्ल पटेल म्हणाले की, स्थानिक स्तरावर काही जणांची इच्छा असते की आपल्या पक्षाने निवडणूक लढवली पाहिजे. हा निर्णय पूर्णपणे स्थानिक नेतृत्वाने घेतलेला होता. आमच्या पक्षाच्या शीर्ष नेतृत्वाकडून यावर काही विशेष लक्ष दिलेले नव्हते. बिहार निवडणुकीसाठी उमेदवार देण्याचे अंतिम आदेश अजित पवार यांनी दिलेले नव्हते, तरीही स्थानिक स्तरावर पक्षाच्या संघटनांनी उमेदवार उभे केले.

प्रफुल्ल पटेल म्हणाले की, बिहारमधून गंगा नदी पश्चिम बंगालपर्यंत जात असल्याने हे ममता बॅनर्जी यांना एक प्रकारे इशारा आहे. पंतप्रधान मोदींच्या धोरणाचा परिणाम शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान होणाऱ्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची कामगिरी चांगली राहणार आहे. या निवडणुकीत जास्त उमेदवार निवडून येतील कदाचित सरकार सुद्धा येईल. त्यामुळे गंगा ते गंगा सागर असा पंतप्रधानांचा नारा योग्य आहे.

प्रफुल्ल पटेल म्हणाले, महायुतीच्या तिन्ही पक्षांमध्ये कार्यकर्त्यांची उत्सुकता खूप जास्त आहे. ९ वर्षांनंतर होणाऱ्या या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांना न्याय देणे महत्त्वाचे आहे. तिन्ही पक्ष एकत्र लढले, तर काही वेगवेगळ्या परिस्थिती निर्माण होऊ शकतात. त्यामुळे स्थानिक निर्णय स्थानिक पातळीवर घ्यावा लागतो. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील निवडणुका आम्ही स्वबळावरच लढत आहोत, आणि आवश्यक असल्यास काही ठिकाणी तडजोड करू.

### भाजप वॉर्ड अध्यक्षाच्या हत्येनंतर नागपुरात तणाव

# संतप्त नागरिकांचा रास्ता रोको

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६ :**

नागपूरमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वॉर्ड अध्यक्षाची हत्या करण्यात आली आहे. सचिन उर्फ सोनू ओमप्रकाश शाहू (वय ४०, रा. शाहू मोहल्ला, वृंदावननगर) असे मृताचे नाव आहे. यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विटाभट्टी चौक परिसरात शनिवारी ही थरारक घटना घडली. या घटनेमुळे संतप्त नागरिकांनी रविवारी कांजी हाऊस परिसरात रास्ता रोको आंदोलन केले. आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवून त्याला फाशी देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सचिन यांच्या मुलगा प्रीतचा पहिला वाढदिवस होता. त्यांनी सायंकाळी नातेवाईक आणि मुलांसाठी पाटीर्चे आयोजन केले होते. सकाळी ते भाजपच्या बैठकीतही सहभागी झाले होते. दुपारी २ वाजताच्या सुमारास विटाभट्टी चौकातील हॉटेलमध्ये समोशांची ऑर्डर देऊन ते दुचाकीवरून घरी परतत असताना ही घटना घडली.

काही अंतरावर दोन दुचाकींवरून आलेल्या चार युवकांनी सचिन यांना अडवले. दोघांनी धारदार शस्त्रांनी त्यांच्या शरीरावर अनेक वार केले. रक्ताच्या थारोळ्यात सचिन खाली कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. मारेकरी घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच यशोधरानगर पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

या हत्येमागे जुना वाद असल्याचे समोर आले आहे. गणेशोत्सवादरम्यान परिसरात राहणारा सोनू नावाचा युवक मंडपात मांसाहार करून आल्याचे सांगत होता. यामुळे सचिन यांनी त्याला फटकारले होते. सचिन यांनी फटकारल्याने सोनू संतप्त झाला होता. या घटनेनंतर सोनूने कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने सचिन यांच्या घरावर हल्ला करून त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण केली होती. सचिन यांनी यशोधरानगर पोलिसांत तक्रार केली होती, परंतु कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यानंतर सचिन यांनी पोलीस उपायुक्तांकडे तक्रार केली, ज्यानंतर पोलिसांनी सोनूंविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली. तेव्हापासून सोनू संतप्त होता.

# राजा तिडके यांचा भाजपमध्ये प्रवेश



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६ :**

भाजपच्या नगर पंचायत अध्यक्षपदांच्या उमेदवरांच्या नावाची घोषणा होण्याच्या काही तासापूर्वी मौदा तालुक्यातील काँग्रेस नेते व प्रदेश सचिव राजा तिडके यांनी रविवारी भाजप नेते व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थित भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेससाठी हा धक्का मानला जातो.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रणजित देशमुख यांचे समर्थक बाबुराव तिडके यांचे राजा उर्फ प्रसन्ना तिडके हे चिरंजीव आहेत. यापूर्वी त्यांनी काँग्रेसकडूम मौदा तालुक्यातील जि.प. सर्कलमधून निवडणूक लढवली होती. पण त्यात त्यांचा पराभव झाला होता. मौदा ही नगरपंचायत झाली आहे, काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची चर्चाही होती. भारतीय जनता पक्षाची नगर पंचायत अध्यक्षपदाच्या उमेदवारांची यादी रविवारी जाहीर होणार असे यापूर्वीच सांगण्यात आले होते. ती दुपारपर्यंत जाहीर झाली नव्हती. त्यापूर्वीच नागपूरमध्येआयोजित एका कार्यक्रमात तिडके यांचा भाजप प्रवेश झाला. त्यांना भाजपकडून नगरपंचायत अध्यक्षपदाची उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नागपूर येथील जनसंपर्क कार्यालयात माजी आमदार. टेकचंद सावरकरजी व भाजप तालुका मंडळ अध्यक्ष मुकेश अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली प्रसन्ना (राजाभाऊ) तिडके, काँग्रेसचे दिलीप सिरसाम, कल्पनाताई मानकर, माजी नगरसेविका नंदाताई इनवाते, सावित्रीताई काटकर, वषार्ताई लारोकर, नाना इंगळे, राजेंद्र जैस्वाल, पृथ्वीराज गुजर, नितेश सुपारे यांच्यासह अनेक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.यावेळी चांगोजी तिजारे, मनीराम यादव, शरद भोयर, मंगेश ठोंबरे, नरेश मोटघरे, खुशाल तांबडे, रमेश कुंभलकर, भूषण सावरकर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कृषी विभागातील गैरव्यवहार चौकशीच्या रडारवर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**

कृषी विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार तसेच शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे सुरू केलेल्या कृषी संस्था, उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्रे आता चौकशीच्या रडारवर येणार आहेत. या प्रकरणाची चौकशी आता 'यशदा'चे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. पुराव्यानिशी तक्रार केल्यास कृषी विभागातील योजनेतील गैरव्यवहारावर चौकशीचा ससेमिरा लागणार आहे.

दरम्यान, भाजपचे आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागाचे प्रधान सचिव आणि कृषी आयुक्त यांच्याकडे याबाबत तक्रार केली होती. कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी नातेवाईक आणि मित्रांच्या नावाने निविष्ठा कंपन्या स्थापन केल्या आहेत. या कंपन्यांमार्फत उत्पादित झालेली खते, बियाणे, औषधे आणि कीटकनाशके घेण्याची सक्ती शेतकऱ्यांवर केली जाते, असा आरोप धस यांनी केला होता. आमदार धस यांनी ११ मार्च रोजी केलेल्या तक्रारी सोबत ४३ अधिकाऱ्यांची नावे, कंपन्यांची नावे, कंपनी सुरू झाल्याची तारीख, कंपनीचा पत्ता, कंपनी कुणाच्या नावाने आहे, त्याचे अधिकाऱ्यांशी नाते आणि सीआयएन क्रमांक अशी सविस्तर माहिती दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने कृषी विभागाने कृषी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची एक चौकशी समिती नेमली होती.

# आगीत होरपळून दगावली २९ मुकी जनावरे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**

गोमांस विक्री आणि वाहतूकीवर बंदी असतानाही कत्तलीसाठी घेऊन जात असलेल्या मुक्या गोधनाच्या बाबतीत रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास हृदय पिळवटून टाकणारी धक्कादायक घटना घडली. अपघाताच्या दुर्दैवी घटनेनंतर ट्रकचा भडका उडून होरपळून दगावलेल्या २९ मुक्या प्राण्यांच्या हांबरड्याच्या आक्रोशाने कळमेश्वर तालुका हादरून गेला. ट्रकमध्ये कोंबलेल्या अवस्थेत तस्करीसाठी वाहून नेणाऱ्या ट्रकला हा भीषण अपघात घडला. काही सेकंदात ट्रकने पेट घेतल्याने २९ मुक्या प्राण्यांचा आगीत होरपळून मृत्यू झाला.

कळमेश्वर तालुक्यातल्या फेट्री ते गोरेवाडा दरम्यान फेट्री शिवार परिसरात रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. ट्रकमध्ये दाटीवाटीने कोंबलेल्या अवस्थेत ही ३६ जनावरे नागपूर पासून जवळच भंडारा मार्गावरच्या महालगाव परिसरातून कळमेश्वरकडे वाहून नेली जात होती. दरम्यान फेट्री शिवारात ट्रकला भीषण अपघात झाला. अपघातानंतर ट्रक इंधनाच्या टाकीच्या दिशेने कलंडला. अपघातग्रस्त ट्रक रस्त्यावर दूरपर्यंत फरफट गेल्याने आगीच्या ठिणग्यांनी ट्रकने काही क्षणांत पेट घेतला.

आगीचा भडका उडाल्याने ट्रकमध्ये कोंबून भरलेले मुके गोधन एमकेकांच्या अंगावर कोसळले. ट्रकमध्ये दोरीने त्यांना बांधून ठेवलेले असल्याने एकाही मुक्या प्राण्याला साधे उठता देखील आले नाही. तोच काही क्षणात आगीचा भडका उडून ट्रकमधल्या २९ मुक्या जनावरांचा अक्षरशः कोळसा झाला. या प्रकरणात ग्रामीण पोलीसांनी तत्काळ ट्रकचा चालक नासीर याला अमरावती येथून अटक केली आहे. सोबतच ट्रकचा चालक आणि त्याच्या वाहकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून ही जनावरे कशासाठी दाटीवाटीने कोंबून नेली जात होती, याची आता चौकशी केली जात आहे. त्यातच कत्तलीसाठी वाहून नेल्या जाणाऱ्या ट्रकला भीषण अपघात होऊन दगावलेल्या जनावरांमुळे ग्रामीण भागातील कत्तलखाने पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

